महाराष्ट्र विधानसभा

दुसरे अधिवेशन, २०२२

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

मुंबई-अहमदाबाद अतिजलद रेल्वे (बुलेट ट्रेन) प्रकल्पाबाबत

(१) १४४८७ (१३-०९-२०२०). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.विनोद निकोले (डहाणू) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-अहमदाबाद अतिजलद बुलेट ट्रेन प्रकल्पासाठी पालघर जिल्हाधिकारी यांनी दिनांक १३ जुलै, २०२० रोजी वा त्यासुमारास लोकप्रतिनिधींसोबत दुरचित्र संवाद बैठकीचे आयोजन केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बैठकीत सहभागी झालेल्या अधिकांश लोकप्रतिनिधी व सरपंचांनी या प्रकल्पाला विरोध दर्शविला असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू बैठकीमध्ये जमिनीला दिला जाणाऱ्या मोबदला तसेच पुनर्वसनासंदर्भात नोंदविण्यात आलेले प्रमुख आक्षेप काय आहेत व सदरहू बुलेट ट्रेन प्रकल्प राबविण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे?

श्री. बाळासाहेब थोरात (०२-०३-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) सदरहू बैठकीत भूसंपादनाचा मोबदला व **पुनर्वसनासंदर्भात** पुढील आक्षेप नोंदविण्यात आले-

• मुंबई-अहमदाबाद अतिजलद रेल्वे प्रकल्पासाठी तलासरी तालुक्यातील संपादित होणाऱ्या बहुतांश जमिनी सावकार किंवा इतर व्यक्तींच्या नावे आहेत. मात्र सदर जमिनी आदिवासी खातेदार ४० ते ५० वर्षापासून कसत आहेत. त्यामुळे संपादनकामी देण्यात येणारा संपूर्ण मोबदला आदिवासी खातेदार यांना देण्यात यावा.

• शहरी व ग्रामीण भागातील दरांमध्ये असणारी तफावत दूर करावी.

• ज्या गावास वाढीव दर देण्यात आला आहे, त्याच्या शेजारील गावांस देखील तोच दर देण्यात यावा.

• पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेनुसार इंदिरा आवास योजनेंतर्गत देण्यात येणारा मोबदला अत्यल्प असून तो दुप्पट करण्यात यावा.

• प्रकल्पबाधितांचे पुनर्वसन त्यांच्या गावातच करण्यात यावे.

• **प्रकल्प राबविण्याबाबत शासनाची भूमिका** मुंबई-अहमदाबाद अति जलदगती रेल्वे मार्ग प्रकल्पाच्या विशेष उपयोजिता वाहनामध्ये महाराष्ट्र शासनाचे २५ टक्के भागभांडवल घेण्याबाबत शासन निर्णय दिनांक १२.०९.२०१७ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

दिवा (जि.ठाणे) येथे महानगरपालिका क्षेत्रांतर्गत नवीन स्वतंत्र पोलिस ठाणे निर्माण करण्याबाबत

(२) ३२४७८ (०७-०१-२०२२). श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण) : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिवा (जि.ठाणे) या परिसरातील गावांसाठी नवीन स्वतंत्र पोलिस ठाणे निर्माण करण्याबाबतचे मागणीचे सविस्तर पत्र गृहमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना कल्याण ग्रामीण विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १६ जून, २०२१ रोजी वा त्यासुमारास सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलीस आयुक्तालय, ठाणे शहर यांनी ठाणे पोलिस आयुक्तालयाच्या अधिपत्याखालील मुंब्रा पोलीस ठाण्याचे विभाजन करुन दिवा येथे नवीन पोलीस ठाणे निर्माण करण्याबाबतचा प्रस्ताव क्र.ठाआ/प्रशा-२(४२५)/दिवा/१४१५/१३, दिनांक २०१३ अन्वये पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडून नमूद पोलिस ठाणे निर्माण होण्याकरिता पत्र क्र.पोमसं/२६अ/४७/अतिपदनिर्मिती/२८/२०१५, दिनांक २८ सप्टेंबर, २०१५ अन्वये शासनास सादर केला असून सदर प्रस्ताव शासन स्तरावर प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रस्ताव प्रलंबित असण्याबाबतची सर्वसाधारण कारणे काय असून सदरहू प्रस्तावास मंजुरी होऊन दिवा येथे नवीन पोलीस ठाणे निर्माण करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिलीप वळसे-पाटील (०८-०३-२०२२) :(१) होय.

(२) व (३) ठाणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या अधिपत्याखालील मुंब्रा पोलीस ठाणेचे विभाजन करून दिवा येथे नवीन पोलीस ठाणे निर्माण करण्याबाबतचा प्रस्ताव पोलीस महासंचालक कार्यालयाने पदनिर्मितीच्या दुसऱ्या टप्प्यात एकत्रित शासनास सादर केला होता.

तथापि, स्वतंत्र सुधारित प्रस्ताव (आवर्ती व अनावर्ती खर्चासह) शासनास सादर करणेबाबत पोलीस महासंचालक कार्यालयास कळविण्यात आले आहे.

स्वतंत्र सुधारित प्रस्ताव शासन स्तरावर प्राप्त झाल्यानंतर वित्त विभागाच्या मान्यतेने पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

वसई (जि.पालघर) येथे आई वडिलांचे छत्र हरपलेल्या आणि फुटपाथवर राहणाऱ्या एका अल्पवयीन मुलीवर नराधमांनी बलात्कार केल्याबाबत

(३) ३२८९२ (०७-०१-२०२२). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई (जि.पालघर) येथे आई वडिलांचे छत्र हरपलेल्या आणि फुटपाथवर राहणाऱ्या १७ वर्षीय अल्पवयीन मुलीवर तिघा नराधमांनी बलात्कार केल्याचे दिनांक ३० ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त बलात्कार करणाऱ्या आरोपींना अटक करण्यात आले असल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी संबंधित आरोपींवर कायद्यांन्वये कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिलीप वळसे-पाटील (२४-०३-२०२२) : (१) होय
(२) व (३) याबाबत मुंबई सेंट्रल रेल्वे पोलीस ठाणे येथे भा. दं. वि. संहिता कलम ३६३, ३७६, ३७६(२), (ड) सह बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२ च्या कलम ६ प्रमाणे गु.र.क्र. ००/२०२१ अन्वये दिनांक ०८/०८/२०२१ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हा पुढील तपासकामी वसई रोड रेल्वे पोलीस ठाणे येथे गु.र.न. ३४३/२०२१, दिनांक ०८ ऑगस्ट, २०२१ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.
सदरील गुन्हयामध्ये ३ आरोपींना अटक करण्यात आली आहे. सदर प्रकरण सध्या न्यायप्रविष्ठ आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राधानगरी-कागल (जि. कोल्हापूर) उपविभागीय अधिकारी, यांच्या सेवा कालावधीतील व त्यांच्या सहकार्यांच्या चुकीच्या कामकाजांची चौकशी करण्याबाबत

(४) ३३२१५ (०६-०१-२०२२). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राधानगरी-कागल (जि.कोल्हापूर) उपविभागीय अधिकारी यांच्या सेवा कालावधीतील व त्यांच्या सहकार्यांच्या चुकीच्या कामकाजांची चौकशी करून त्यांचेवर तात्काळ कार्यवाही करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य व अप्पर मुख्य सचिव, महसूल व मुद्रांक शुल्क यांचेकडे दिनांक २० जानेवारी २०२१ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपविभागीय अधिकारी यांचेवरील तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचेकडे तक्रारदारांची घेण्यात आलेल्या सुनावणी व त्यानुषंगाने सादर केलेल्या चौकशी अहवालानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, उपविभागीय अधिकारी यांचेवर महाराष्ट्र नागरी सेवा (अपिल व शिस्त) अधिनियम १९७९ अंतर्गत कोणती कारवाई प्रस्तावित केली आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बाळासाहेब थोरात (०४-०३-२०२२) : (१), (२) व (३) उपविभागीय अधिकारी, राधानगरी-कागल जि.कोल्हापूर यांच्याविरुध्द मा. लोकप्रतिनिधी यांच्याकडून तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. सदर तक्रारी बाबत विभागीय आयुक्त, पुणे यांच्याकडून प्राप्त अहवालाचे अवलोकन केले असता, तक्रारीमध्ये प्रथमदर्शनी तथ्य आढळून आल्याने त्यांची शासन आदेश क्र. टिआरएफ-०२२१/प्र.क्र.१९/ई-२, दिनांक ०५ एप्रिल, २०२१ अन्वये उपजिल्हाधिकारी भुसंपादन क्र.४, सातारा या पदावर बदली करण्यात आली आहे.

सदर तक्रारींच्या अनुषंगाने तत्का. उपविभागीय अधिकारी, राधानगरी-कागल जि.कोल्हापूर यांच्याविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ नुसार विभागीय चौकशी करण्याबाबत विभागीय आयुक्त पुणे यांच्याकडून मागविण्यात आलेला प्रस्ताव अद्याप अप्राप्त आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुक्ताईनगर, रावेर, बोदवड (जि.जळगांव) या तालुक्यांमधील पशुवैद्यकिय अधिकारी व कर्मचारी यांची रिक्त पदे भरण्याबाबत

(५) ३३३३३ (०७-०१-२०२२). श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) : सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुक्ताईनगर विधानसभा मतदार संघातील मुक्ताईनगर, रावेर, बोदवड (जि.जळगांव) या तालुक्यांमधील पशुवैद्यकिय अधिकारी व कर्मचारी यांची पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू रिक्त पदे भरण्याबाबत पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १२ जुलै, २०२१ रोजी वा त्यासुमारास लेखी निवदेनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुनिल केदार (२२-०३-२०२२) : (१) व (२) शासन आदेश दिनांक ०८ फेब्रुवारी, २०२२ अन्वये राज्यात एकूण ४२८ पशुधन विकास अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यातील जळगाव जिल्ह्यामधील मुक्ताईनगर तालुक्यात २, रावेर तालुक्यात २ आणि बोदवड तालुक्यात १ अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे, सद्यस्थितीत मुक्ताईनगर तालुक्यातील ४, रावेर तालुक्यातील ५ आणि बोदवड तालुक्यातील २ पदे रिक्त आहेत. सदरहू रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार नजिकच्या पशुधन विकास अधिकाऱ्यांकडे सोपवून शेतकऱ्यांना तसेच पशुपालकांना नियमितपणे पशुवैद्यकीय सेवा पुरविण्यात येत आहेत. सदरहू रिक्त पदे भरण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींची लेखी निवेदने शासनास प्राप्त झाली आहेत.

(३) महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत पशुधन विकास अधिकारी संवर्गाची जाहिरात क्र. १२/२०२२ अन्वये २१२ पदे सरळसेवेने भरण्याची कार्यवाही सुरु असून, सदर अधिकारी उपलब्ध झाल्यानंतर उक्त मागणीच्या अनुषंगाने आवश्यकतेनूसार रिक्त पदे भरण्याचे संकल्पित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

मिरा-भाईंदर (जि.ठाणे) महानगरपालिका क्षेत्रातील इमारतीचे मानीव अभिहस्तांतरण प्रक्रिया पूर्ण करून ना-हरकत दाखला मिळण्याबाबत

(६) ३३३४० (०७-०१-२०२२). श्रीमती गीता जैन (मिरा भाईंदर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरा-भाईंदर (जि.ठाणे) महानगरपालिका क्षेत्रात अनेक जुन्या मोडकळीस आलेल्या इमारतींचे मानीव अभिहस्तांतरण प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर ते ७/१२ उताऱ्यावर अंतिम फेरफार करण्याची प्रक्रिया सुरु करतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांकडून दि इस्टेट इनवेस्टमेंट कं.प्रा.लि ह्या कंपनीचा ना-हरकत दाखला, नागरी जमीन (कमाल धारणा व विनियमन) विभागाचा ना हरकत दाखला, जिल्हाधिकारी यांच्याकडील अकृषिक दाखला मागितला जातो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त दाखले संबंधित सोसायट्यांकडे उपलब्ध नसल्याने मानीव अभिहस्तांतरण व अंतिम ७/१२ फेरफारची प्रक्रिया पूर्ण होऊ शकली नसल्यामुळे जुन्या मोडकळीस आलेल्या ह्या रहिवाश्यांच्या सोसायट्यांना उक्त ना-हरकत दाखले मिळण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे दिनांक १३ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बाळासाहेब थोरात (२३-०३-२०२२) : (१), (२), (३), (४) व (५) “मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील जुन्या मोडकळीस आलेल्या इमारतीचे मानीव अभिहस्तांतरण प्रक्रिया पूर्ण करण्याबाबत येत असलेल्या अडचणीबाबत” स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. मंत्री (महसूल) यांना दिनांक १३/०१/२०२१ रोजी निवेदन दिले होते. सदरहू निवेदनाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, ठाणे यांनी विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई यांच्यामार्फत प्रस्ताव शासनास सादर केला असून सदरहू प्रस्ताव तपासण्यात येत आहे.

शिरुर तालुक्यातील पशुधन विकास अधिकारी रिक्त पदे भरण्याबाबत

(७) ३३४४६ (०७-०१-२०२२). श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) : सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मांडवगण फराटा, न्हावरा, तळेगाव ढमढेरे व पंचायत समिती शिरुर (ता.शिरूर, जि.पुणे,) येथे पशुधन विकास अधिकारी वर्ग-१ ची पदे रिक्त असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे पशुपालकांना आवश्यक सेवा वेळेवर उपलब्ध होत नसून लाळ खुरकुत लस पशुधनांना अद्यापपर्यंत मोठ्या संख्येने देणे प्रलंबित असल्याचे आढळून आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर शिरुर तालुक्यातील पशुधनांना सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी पशुधन विकास अधिकारी वर्ग-१ ची रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुनिल केदार (२२-०३-२०२२) : (१) व (२) शिरुर तालुक्यातील पशुवैद्यकीय दवाखाना, मांडवगण फराटा व न्हावरा येथील पशुधन विकास अधिकारी (गट-अ) संवर्गातील रिक्त पदे शासन आदेश दिनांक ०८/०२/२०२२ अन्वये सरळसेवा भरतीने भरण्यात आली आहेत व पशुवैद्यकीय दवाखाना, तळेगाव ढमढेरे येथील पशुधन विकास अधिकारी (गट-अ) हे पद शासन बदली आदेश दिनांक ०९/०८/२०२१ अन्वये भरण्यात आले आहे. तसेच पशुधन विकास अधिकारी, (विस्तार) पंचायत समिती शिरुर या रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार नजिकच्या पशुवैद्यकीय दवाखाना, रांजणगाव गणपती यांचेकडे सोपविण्यात येवून पशुपालकांना नियमितपणे आवश्यक सेवा पुरविल्या जातात.

शिरुर तालुक्यातील मांडवगण फराटा, न्हावरा, तळेगाव ढमढेरे येथील सुमारे ९०% हून अधिक पशुधनास राष्ट्रीय पशुरोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत दुसऱ्या फेरीतील लाळ खुरकुत लसीकरण करण्यात आलेले आहे.
(३) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाद्वारे विभागातील पशुधन विकास अधिकारी संवर्गातील २१२ रिक्त पदे भरणेबाबत जाहिरात क्र.१२/२०२२ प्रसिद्ध करण्यात आली असून, त्याद्वारे रिक्त पदे भरण्याचे संकल्पित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

"मागेल त्याला शेततळे" या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना अनुदानाची रक्कम मिळण्याबाबत

(८) ३३४७२ (०७-०१-२०२२). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) : सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) "मागेल त्याला शेततळे" या योजनेंतर्गत शेतकऱ्यांना देय असलेल्या अनुदानाची रक्कम शासनाकडून उपलब्ध होण्याबाबत लोकप्रतिनिधी यांनी जलसंपदा मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक १२ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संदीपानराव भुमरे (०१-०४-२०२२) :(१) होय, हे खरे आहे.
(२) “मागेल त्याला शेततळे” योजनेसाठी विभागाच्या दिनांक १७.११.२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये रु. ५२.५० कोटी इतका निधी आयुक्त कृषी यांना उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

मिरा-भाईंदर (जि.ठाणे) व महानगरपालिका क्षेत्रातील येथील 'जैव विविधता उद्यान' विकसीत करण्यासाठी आरक्षित जागा महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाकडे हस्तांतरीत करण्याबाबत

(९) ३३५०७ (०६-०१-२०२२). श्रीमती गीता जैन (मिरा भाईंदर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरा-भाईंदर (जि.ठाणे) महानगरपालिका क्षेत्रातील मौजे उत्तन येथील सर्वे नं.३५२ अ मधील एकुण ९९.९२ हेक्टर जागेपैकी ३१ हेक्टर जागा 'जैव विविधता उद्यान' विकसीत करण्यासाठी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाकडे हस्तांतरीत करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडे लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जागेचा ताबा महसूल खात्याकडे असल्याने महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाकडे जागा अद्याप हस्तांतरीत न करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, जैव विविधता उद्यानासाठी आवश्यक असलेली जागा महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाकडे हस्तांतरीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बाळासाहेब थोरात (०३-०३-२०२२) : (१), (२), (३) व (४) मौजे उत्तन, ता.जि.ठाणे येथील स.नं. ३५२अ क्षेत्र ९९-९२ हे. आर पैकी ३१-०० हे. आर ही जमीन जैव विविधता उद्यान (Bio Diversity Park) विकसित करण्यासाठी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ मर्यादित यांना उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, कोकण व जिल्हाधिकारी, ठाणे यांनी शासनास सादर केला आहे. त्यानुषंगाने नगर नियोजन व बांधकामाच्या दृष्टिने नगर विकास विभागाचे अभिप्राय मागविण्यात आले असून अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर नियमानुसार उचित कार्यवाही करण्याचे संकल्पित आहे.

मौजे सारमाळ (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील क्र.४८/०८, चे बिनशेती आदेश रद्द करण्याबाबत

(१०) ३३५३२ (१०-०१-२०२२). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे सारमाळ (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील क्र.४८/०८, दिनांक १८/०९/२००८ चे बिनशेती आदेश उपवनसंरक्षक, शहापूर यांचे अभिप्राय अथवा ना-हरकत दाखल न घेता तसेच नगर रचनाकार, ठाणे यांचेकडून नकाशे मंजूर न करता केवळ मंजूर टिप्पणीद्वारे बिनशेती आदेश पारित केल्याने अध्यक्ष, कुणबी महोत्सव प्रतिष्ठाण कोकण विभाग यांनी दिनांक १२/३/२०२० रोजी या आदेशाची चौकशी करून बिनशेती आदेश रद्द करण्याबाबत मागणी केली असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार त्यात काय आढळून आले आहे,
(३) असल्यास, तद्नुसार उक्त मागणीच्या अनुषंगाने चौकशी करून बिनशेती आदेश रद्द करुन संपूर्ण कागदपत्रांची पूर्तता नसताना बिनशेती आदेश पारित करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. बाळासाहेब थोरात (२३-०३-२०२२) : (१), (२), (३) व (४) मौजे सारमाळ, ता. शहापूर, जि. ठाणे येथील स. नं. १८ ते ५८ मधील सुमारे २,८४,३०० चौ. मी. जमिनीबाबत जिल्हाधिकारी, ठाणे यांनी दिनांक १८/०९/२००८ च्या आदेशान्वये बिनशेती परवानगी दिली आहे.
सदर बिनशेती आदेश रद्द करण्याची विनंती अध्यक्ष, कुणबी महोत्सव प्रतिष्ठाण, कोकण विभाग यांनी विभागीय आयुक्त, कोकण विभाग, मुंबई यांचेकडे दिनांक १३/०१/२०२० रोजी केली होती. जिल्हाधिकारी, ठाणे यांचे उक्त बिनशेती आदेश महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम २५८ नुसार पुनर्विलोकनात घेण्यास विभागीय आयुक्त, कोकण यांनी मान्यता दिली होती. त्यानुषंगाने जिल्हाधिकारी, ठाणे यांनी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम २५८ नुसार दिनांक २०.१२.२०२१ रोजीच्या आदेशात नमूद केलेल्या कारणास्तव अर्जदार यांचा तक्रार अर्ज निकाली काढलेला आहे. तसेच जिल्हाधिकारी, ठाणे यांचा दिनांक १८/०९/२००८ रोजीचा अकृषिक व बांधकाम परवानगी आदेश कायम ठेवला आहे.

राज्यातील जिल्हयांमध्ये रेती घाट व डम्पिंग यार्डवर सी.सी.टी.व्ही कॅमरे लावण्याबाबत

(११) ३३८१४ (०६-०१-२०२२). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात रेती तस्करीच्या माध्यामातुन कोट्यवधीची उलाढाल होत असल्यामुळे शासनाने त्यांच्यावर अंकुश लावण्यासाठी रेती घाट धारकाने रेती घाट, रेती वाहुन नेण्याचा रस्ता, डंपीग यार्डवर सी.सी.टी.व्ही कॅमेरे लावण्याचे आदेश दिनांक ३ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास जारी केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अधिका-यांचा निष्काळजीपणा, दुर्लक्षपणामुळे जिल्ह्यात रेती घाट चालविणा-या रेती माफीयांसाठी शासनाच्या उक्त आदेशाची अंमलबजावणी न करता कागदावरच नाममात्र ठेवण्यात आल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधित दोषींविरुध्द कारवाई करुन शासनाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बाळासाहेब थोरात (२८-०२-२०२२) : (१) वाळू / रेती निर्गती धोरण, दिनांक ३/१/२०१८ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार प्रत्येक वाळूगटाच्या ठिकाणी छायाचित्रण होण्यासाठी लिलावधारकामार्फत सीसीटीव्ही बसविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

(२) अशी बाब निदर्शनास आली नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई पोलिसांनी सेक्सटॉर्शनचे रॅकेट पकडल्याची व्याप्ती मोठी असल्याबाबत

(१२) ३३९५३ (१०-०१-२०२२). श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड) : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई पोलिसांनी सेक्सटॉर्शनचे रॅकेट पकडले असून त्याची व्याप्ती मोठी असल्याचे माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रॅकेटमध्ये सामान्य माणसांपासून बॉलिवूडचे जवळपास १०० सेलिब्रिटीज अडकल्याची माहिती समोर आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी किती जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले, तसेच याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिलीप वळसे-पाटील (०९-०३-२०२२) : (१), (२) व (३)

इंन्स्टाग्राम अकाऊंट धारकाने रकमेची मागणी करुन ती न दिल्यास नग्न छायाचित्र व अश्लील चलचित्र (व्हीडीओ) इंटरनेट/सोशल मिडियावर प्रसारित करण्याची धमकी दिल्याबाबत फिर्याद प्राप्त झाल्याने पश्चिम विभाग सायबर पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.र.क्र.२३/२१ भा.दं.वि. कलम ३८४, ३८५ सह माहिती तंत्रज्ञान कायदा कलम ६७ नुसार गुन्हा नोंदविण्यात आला आहे. सदर प्रकरणी आरोपींकडे २५० बळितांचे व्हिडीओ व फोटो असल्याचे तपासादरम्यान समोर आले. या गुन्ह्यामध्ये एकूण चार जणांना अटक करण्यात आले असून त्यांच्या विरुद्ध मा.न्यायालयात दोषारोप पत्र सादर करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

वसई (जि.पालघर) तालुक्यातील अर्नाळा जेट्टी बांधण्याचे काम संथ गतीने होत असल्याबाबत

(१३) ३४१०७ (०७-०१-२०२२). श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) : सन्माननीय **बंदरे मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई (जि.पालघर) तालुक्यातील अर्नाळा किल्ल्यात रहाणाऱ्या नागरीकांच्या दळणवळणासाठी अर्नाळा समुद्र किनाऱ्यावर जेट्टी बांधण्यासाठी सुमारे २६ कोटींचा निधी मंजूर होऊनही अद्यापपर्यंत काम पूर्णत्वास आले नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने उक्त ठिकाणाची पाहणी केली आहे काय, तसेच जेट्टीच्या कामाची सद्यस्थिती काय आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर जेट्टीच्या बांधणीचे काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अस्लम शेख (११-०३-२०२२) : (१) व (२) वसई तालुक्यातील अर्नाळा किल्ल्यात रहाणा-या नागरिकांच्या दळणवळणासाठी अर्नाळा समुद्र किना-यावर व किल्ल्यालगत जेट्टी बांधण्याची कामे हाती घेण्यात आली असून अर्नाळा समुद्र किना-यालगतच्या जेट्टीच्या कामास जिल्हा नियोजन समिती, यांचेकडून रु.२४१.६५ लक्ष इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. अर्नाळा किल्ला येथे प्रवासी जेट्टी बांधण्याचे काम केंद्रशासनाच्या सागरमाला योजनेअंतर्गत हाती घेण्यात आले असून सद्यस्थितीत सदर दोन्ही काम प्रगतीपथावर आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

जिंतूर-सेलू (जि.परभणी) या तालुक्यातील मुद्रांक शुल्क नोंदणी कार्यालयाच्या नवीन इमारत बांधणीबाबत

(१४) ३४१३० (०७-०१-२०२२). श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिंतूर-सेलू (जि.परभणी) या तालुक्यातील मुद्रांक शुल्क नोंदणी कार्यालयाच्या नवीन इमारत बांधणीबाबतचा प्रस्ताव मंत्रालय स्तरावर अनेक महिन्यांपासून प्रलंबित असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्ताव प्रलंबित असण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासानाने चौकशी करून जिंतूर व सेलू तालुक्यातील मुद्रांक शुल्क नोंदणी कार्यालयाच्या नवीन इमारत बांधणीचा प्रस्ताव मंजूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बाळासाहेब थोरात (०४-०३-२०२२) : (१) हे खरे आहे.

(२) व (३) तालुका जिंतूर व सेलू, जि. परभणी येथील मुद्रांक शुल्क नोंदणी कार्यालयाच्या नवीन इमारत बांधणीचा प्रस्ताव शासन स्तरावर विचाराधिन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

माजलगाव (जि.बीड) तहसील कार्यालयाअंतर्गत तलाठी व मंडळ अधिकारी यांना शासकीय निवासस्थाने असताना घरभाडे अदा केल्याबाबत

(१५) ३४२४९ (०७-०१-२०२२). श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माजलगाव (जि.बीड) तहसील कार्यालयाअंतर्गत तलाठी व मंडळ अधिकारी यांच्यासाठी शासकीय निवासस्थानाचे बांधकाम करण्यात आले असुन बांधकामे सुस्थितीत नसल्याने अधिकारी मुख्यालयात रहात नसताना देखील तहसीलदार, माजलगाव, (जि.बीड) यांनी दिनांक १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२० या कालावधी मध्ये घरभाडे अदा केलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घरभाड्याचे रक्कम शासकीय कोषागात जमा करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणातील दोषी तहसीलदाराविरुद्ध कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बाळासाहेब थोरात (०३-०३-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
(२) नाही.
(३) व (४) माजलगांव तहसील कार्यालया अंतर्गत तलाठी व मंडळ अधिकारी यांच्यासाठी बांधण्यात आलेल्या शासकीय निवासस्थानाच्या इमारतीचे दरवाजे / खिडक्या / पाणीपुरवठा / सॅनिटरी फिटींग्स इत्यादी बाबी सुस्थितीत नाहीत. सबब, संबंधित तलाठी व मंडळ अधिकारी यांनी तलाठी व मंडळ अधिकारी कार्यालये नादुरुस्त व राहणे योग्य नसल्याचे कळविल्याने त्यांना देय असलेले घरभाडे कपात करण्यात आलेले नाही. त्याचप्रमाणे तहसिलदार, माजलगांव यांनी उपअभियंता सार्वजनिक बांधकाम, उपविभाग, माजलगांव यांना इमारत दुरुस्तीबाबत कळविलेले आहे.

म्हारळ (ता.कल्याण, जि.ठाणे) ग्रामपंचायतीला सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्पासाठी जागा मिळण्याबाबत

(१६) ३४२७३ (०७-०१-२०२२). श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) म्हारळ (ता.कल्याण, जि.ठाणे) ग्रामपंचायतीला सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्पासाठी म्हारळ येथील सर्वे नंबर ५३/५ येथील जागा मिळण्याबाबतचे पत्र दिनांक २० फेब्रुवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी, ठाणे यांना लोकप्रतिनिधी यांनी सादर केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या दिनांक २८/७/२०२० रोजीच्या पत्रानुसार काही कागदपत्रांच्या पुर्ततेसाठी ग्रामपंचायत म्हारळ यांना देवुन ग्रामपंचायतीने कागदपत्रे जमा करुन जिल्हाधिकारी, ठाणे यांना पाठविण्यात आली असतानाही कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त अधिकारी व विभाग यांच्याकडून दिरंगाई होत असून सुप्रीम कोर्टाने दिलेल्या आदेशाचे पालन होत नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी व्यवस्थापन प्रकल्पासाठी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. बाळासाहेब थोरात (०३-०३-२०२२) :१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) मौजे म्हारळ हद्दीतील सर्वे नं. ५३/५/अ एकूण क्षेत्र ७-८५-० हे. आर पैकी ०-८०-० हे. आर ही जागा सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्पासाठी ग्रामपंचायत, म्हारळ यांना मिळणेबाबतची विनंती सरपंच / ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत, म्हारळ यांनी त्यांच्या दिनांक २१/०८/२०१९ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, ठाणे यांना केलेली आहे.

सदरहू विनंतीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, ठाणे यांनी विभागीय आयुक्त, कोकण

विभाग, नवी मुंबई यांचेमार्फत प्रस्ताव शासनास सादर केलेला आहे. सदरहू प्रस्तावावर ग्राम विकास विभागाकडून अभिप्राय मागविण्यात आलेले आहेत. सदरहू अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर नियमानुसार उचित कार्यवाही करण्याचे संकल्पित आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

उल्हासनगर (जि.ठाणे) तालुक्यातील कायम स्वरूपी
दुय्यम निबंधक नियुक्त करण्याबाबत

(१७) ३४५२३ (०७-०१-२०२२). श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उल्हासनगर (जि.ठाणे) तालुक्यातील दुय्यम निबंधक कार्यालय, उल्हासनगर ५ येथे नोंदणीसाठी नागरिक येत असुन दुय्यम निबंधक हे पद मागील अनेक महिन्यापासून रिक्त असुन पद तातडीने भरण्याकरिता तसेच प्रभारी दुय्यम निबंधक यांची चोकशी करून त्यांची बदली करावी अशी मागणी लोकप्रतिनीधी यांनी मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य तसेच नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक, महाराष्ट्र राज्य पुणे, सह जिल्हा निबंधक वर्ग १ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, ठाणे ग्रामीण यांना दिनांक २६/११/२०२०, दिनांक १/२/२०२१ आणि दिनांक १३/१०/२०२१ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू कामासाठी लिपिकाला प्रभारी पद दिले असुन उक्त कामाची माहिती लिपिकास नसल्यामुळे अनेक अर्ज प्रलंबित असल्याने लिपिकास उक्त प्रभारी पद देण्याचे कारण काय आहे,
(३) असल्यास, नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, पुणे याची लोकप्रतिनिधी यांनी भेट घेतली असता त्यांनी कायमस्वरूपी दुय्यम निबंधक देण्यात येईल असे आश्वासन देवुनही अद्यापी कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, पुणे व नोंदणी उपनिरीक्षक मुख्यालय, पुणे यांनी दिनांक १४ डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास प्रभारी दुय्यम निबंधक यांची चौकशी करून अहवाल देण्याचे निर्देश तसेच सह जिल्हा निबंधक वर्ग १ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, ठाणे ग्रामीण यांच्यामार्फत चौकशी करून अहवाल मागून कार्यवाही करण्यांत येईल असे आदेश देण्यांत आले असताना अद्यापी कार्यवाही करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने प्रभारी दुय्यम निबंधक यांचेवर कारवाई करुन कायमस्वरूपी दुय्यम निबंधक पद भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. बाळासाहेब थोरात (०४-०३-२०२२) : (१) हे खरे आहे.

(२) नोंदणी व मुद्रांक विभागातील दुय्यम निबंधक कार्यालयातील दुय्यम निबंधकाची पदे ही, नियतकालीक बदलीने, पदोन्नतीने किंवा अन्य कारणास्तव दुय्यम निबंधकाचे पद रिक्त झाल्यास नोंदणी अधिनियम १९०८ चे कलम १२ नुसार सदर रिक्त पदाचा तात्पुरता कार्यभार विभागाची परिक्षा पास असलेल्या लिपिकाकडे सोपविण्यात येतो. यानुसार उल्हासनगर कार्यालयातील रिक्त पदाचा पदभार त्याच कार्यालयात कनिष्ठ लिपिक पदावर कार्यरत असलेल्या लिपिकाकडे सोपविण्यात आला होता. सद्य:स्थितीत कार्यालयात नोंदणीसाठी कलम ३४ नुसार एकही दस्त प्रलंबित नाही.

(३) लोकप्रतिनिधी यांची नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, पुणे यांचेशी भेट झाली होती. सद्य:स्थितीत सह दुय्यम निबंधक, वर्ग-२ संवर्गाची पदोन्नतीची कार्यवाही सुरु असून पदोन्नतीची कार्यवाही पूर्ण होताच प्राधान्याने सह दुय्यम निबंधक, उल्हासनगर क्र.५ या ठिकाणी कायमस्वरुपी सह दुय्यम निबंधकाची नियमानुसार नियुक्तीकरण्यात येईल.

(४) श्री.कुमार आयलानी, विधानसभा सदस्य (उल्हासनगर) यांनी दिनांक ०१.०२.२०२१ रोजीच्या पत्रान्वये श्री. राजेश वधारीया हयांनी प्रभारी दुय्यम निबंधक, उल्हासनगर क्र.५ यांच्याबाबत केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने सुनावणी घेणेबाबत कळविलेनुसार नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, पुणे यांनी नोंदणी उपमहानिरीक्षक, ठाणे यांना सदर प्रकरणी सुनावणी घेऊन अहवाल सादर करणेबाबत कळविण्यात आले होते. त्याअनुषंगाने सह जिल्हा निबंधक, ठाणे ग्रामीण यांनी श्री.राजेश वधारिया यांना त्यांचे कार्यालयात दिनांक १५.०२.२०२१ व दिनांक ०२.०३.२०२१ रोजी सुनावणीची संधी दिली असता, दोन्ही सुनावणीस श्री. राजेश वधारिया हे उपस्थित नव्हते व त्यांनी कोणतेही लेखी म्हणणे देखील सादर केलेले नाही.

(५) मागणीच्या अनुषंगाने लिपिकाचा पदभार काढून घेण्यात येवून अन्य लिपिकाकडे सदर पदाचा पदभार सोपविण्यात आलेला असून सद्य:स्थितीत दुय्यम निबंधकांची रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

(६) न्यायालयीन प्रकरणामुळे पदोन्नतीस विलंब झालेला आहे.

मौजे येरवडा (जि.पुणे) येथील ज्ञानेश्वरी शैक्षणिक न्यास या शैक्षणिक संस्थेस वाटप केलेला भूखंड वापराविना पडुन असल्याबाबत

(१८) ३४८६७ (०७-०१-२०२२). श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे येरवडा (जि.पुणे) येथील ज्ञानेश्वरी शैक्षणिक न्यास शैक्षणिक संस्थेस वाटप केलेला भूखंड वापराविना पडून असल्याने शासनाच्या ताब्यात घेण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ५ नोव्हेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास महसूल मंत्री महराष्ट्र राज्य यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. बाळासाहेब थोरात (२३-०३-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
(२) ज्ञानेश्वरी शैक्षणिक न्यास संस्थेस शैक्षणिक प्रयोजनासाठी प्रदान करण्यात आलेल्या मौजे येरवडा, ता.पुणे शहर येथील स.नं.९४/१अ/१ मधील ५.०० एकर जमिनीवरील इमारत बांधकाम मुदतवाढीबाबत जिल्हाधिकारी, पुणे यांनी सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

वसमत (जि.हिंगोली) येथील शेतकऱ्यांना पीक कर्ज उपलब्ध करुन खते व बि-बियाणे पुरवठा करुन देण्याबाबत

(१९) ३४९४० (०५-०१-२०२२). श्री.चंद्रकांत ऊर्फ राजुभैय्या रमाकांत नवघरे (बसमत) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बसमत (जि.हिंगोली) येथील उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, कृषी अधिकारी व व्यापारी यांच्यासमवेत तहसिल कार्यालयात बैठक दिनांक २ जून, २०२१ रोजी वा त्यासुमारास आयोजित करण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बैठकीत स्थानिक लोकप्रतिनिधीनी भाग घेऊन शेतकऱ्यांना पिक कर्ज उपलब्ध करुन खते व बि-बियाणे यांचा पुरवठा करुन देण्याबाबत सुचना केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बसमत तालुक्यातील शेतकऱ्यांना उक्त सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दादाजी भुसे (१५-०३-२०२२) : (१) होय, हे खरे आहे
(२) होय, हे खरे आहे
(३) खरीप हंगाम सन २०२१ मध्ये बसमत जि.हिंगोली तालुक्यासह हिंगोली जिल्हयात माहे एप्रिल २०२१ ते सप्टेंबर २०२१ दरम्यान ८२,५६४ मे. टन रासायनिक खत व ६७,५८५ क्विंटल बियाण्यांचा पुरवठा झालेला आहे. तसेच, बसमत तालुक्यातील दि परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, ग्रामीण बँका व राष्ट्रीयकृत बँका मार्फत सन २०२१-२२ मध्ये शेतकऱ्यांना कर्ज वाटप करण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

अंबाजोगाई (जि. बीड) तालुक्यातील भूमीअभिलेख महसुली विभाग यांच्या अधिनस्थ कार्यालयाला शासकीय जागा उपलब्ध करून देण्याबाबत

(२०) ३४९५१ (१०-०१-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंबाजोगाई (जि.बीड) तालुक्यातील भूमी अभिलेख महसुली विभाग यांच्या अधिनस्थ परीक्षण भूमापन सजा लोखंडीसावरगाव व घाटनांदूर सजे असुन उक्त सजे अंतर्गत एकूण १३

गावांचे नगर भूमापनाचे कामकाज करण्यात येत असताना कार्यालय सद्यस्थितीत भाडेतत्वावरील इमारतीमध्ये कार्यरत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कार्यालयासाठी मौजे चनई (ता.अंबाजोगाई, जि. बीड) येथील सर्वे.नं. २६२ मूळ सर्वे.नं.१७४ एकूण क्षेत्र ०.५९ आर इतके क्षेत्र महाराष्ट्र शासनाच्या मालकीचे असून लोखंडीसावरगाव व घाटनांदूर सजे अंतर्गत येणाऱ्या १३ गावांसाठी चनई हे मध्यवर्ती ठिकाण असुन उपअधीक्षक भूमी अभिलेख, कार्यालय, अंबाजोगाई हे चनई पासून ०४ कि.मी अंतरावर आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरचे भूमी अभिलेख कार्यालय नागरिकांच्या सोयीच्या दृष्टीने चनई येथे करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक ५ जून, २०२१ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त भूमी अभिलेख कार्यालय मौजे चनई येथे करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बाळासाहेब थोरात (२९-०३-२०२२) : (१) व (२) हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) व (५) परिरक्षण भूमापन सज्जा लोखंडी सावरगांव व घटनांदूर च्या कार्यालयाकरीता उप अधिक्षक, भूमी अभिलेख, अंबाजोगाई यांचे कार्यालयाकडून मौजे चनई येथील गट नं. २६२ मुळ सर्वे नं.१७४ एकूण ०-५९ आर इतक्या क्षेत्राचे मागणीबाबतचा प्रस्ताव उप विभागीय अधिकारी, अंबाजोगाई यांचेकडे विहीत नमुन्यात सादर करण्यात आला आहे. प्रकरणी तहसिलदार, अंबाजोगाई यांनी त्रुटींची पूर्तता करून प्रस्ताव सादर करण्यास कळविल्यानुसार उप अधिक्षक, भूमी अभिलेख, अंबाजोगाई यांचेकडून त्रुटींची पूर्तता करून प्रस्ताव पुनश्चः दिनांक २४.२.२०२२ रोजी तहसिलदार, अंबाजोगाई याचेकडे सादर केला आहे.

नांदगाव व मालेगाव (जि.नाशिक) तालुक्यातील रिक्त असलेली पदे भरण्याबाबत

(२१) ३४९६२ (०७-०१-२०२२). श्री.सुहास (आण्णा) व्दारकानाथ कांदे (नांदगाव) : सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदगाव (जि.नाशिक) तालुक्यातील पशुधन विकास अधिकारी यांची १० पदे तसेच मालेगाव तालुक्यात ५ पशुवैद्यकीय पदे रिक्त असल्याचे निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रिक्त पदे तात्काळ भरण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी, २०२० व दिनांक २७ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास पशुसंवर्धन व दुग्धविकास मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने नांदगाव व मालेगाव तालुक्यातील रिक्त पदे प्राधान्याने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुनिल केदार (२२-०३-२०२२) : (१), (२) व (३) नांदगाव (जि.नाशिक) तालुक्यात पशुधन विकास अधिकारी यांची १० पदे मंजूर असून यांपैकी ८ पदे भरली असून सद्यस्थितीत २ पदे रिक्त आहेत, तसेच मालेगाव (जि.नाशिक) तालुक्यात पशुधन विकास अधिकारी यांची १३ पदे मंजूर असून यांपैकी ९ पदे भरली असून सद्यस्थितीत ४ पदे रिक्त आहेत. विभागातील कार्यरत अधिकारी नियत वयोमानाने सेवानिवृत्ती, स्वेच्छानिवृत्ती, नियतकालिक बदल्या तसेच पदोन्नती यांमुळे पदे रिक्त झाली आहेत. सदरहू रिक्त पदे भरण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींची लेखी निवेदने शासनास प्राप्त झाली आहेत. त्यानुषंगाने शासन आदेश क्र. पसंप्र-२०२१/प्र.क्र२२२/ पदुम-१, दिनांक ०८/०२/२०२२ अन्वये एकूण ४२८ पात्रताधारक उमेदवारांना सरळसेवा भरतीने पशुधन विकास अधिकारी (गट-अ) संवर्गात नियुक्ती देण्यात आलेली आहे. सदर शासन निर्णयान्वये नांदगाव तालुक्यातील ६ पदे व मालेगाव तालुक्यातील २ पदे भरण्यात आली असून, सद्यस्थितीत येथील अनुक्रमे २ व ४ पदे रिक्त आहेत, सदर रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार नजिकच्या पशुधन विकास अधिकाऱ्यांकडे सोपवून शेतकऱ्यांना तसेच पशुपालकांना नियमीतपणे सेवा पुरविण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

मनमाड (ता.नांदगाव, जि.नाशिक) येथे दुय्यम निबंधक कार्यालय सुरु करण्याबाबत

(२२) ३४९६५ (१०-०१-२०२२). श्री.सुहास (आण्णा) व्दारकानाथ कांदे (नांदगाव) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मनमाड (ता.नांदगाव, जि.नाशिक) शहरात वर्षाला सरासरी १३०० खरेदी प्रकरणे होत असल्यामुळे नागरिकांना नांदगाव येथे जाण्याची गैरसोय होत असून मनमाड शहरामध्ये दुय्यम निबंधक कार्यालय सुरु करण्याची स्थानिक नागरिकांनी मागणी व लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे लेखी निवेदनाद्वारे सादर केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी अप्पर तहसिल कार्यालयास शासनाने मंजूरी दिली असूनही अद्यापी उक्त कार्यालय सुरु झाले नसल्यामुळे मंजुरी मिळालेले उक्त कार्यालय तात्काळ सुरु करण्याबाबत लोकप्रतिनिधी यांनी महसूल मंत्री महाराष्ट्र राज्य यांच्याकडे माहे फेब्रुवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने मनमाड येथे अप्पर तहसिल कार्यालय व दुय्यम निबंधक कार्यालय सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बाळासाहेब थोरात (०४-०३-२०२२) : (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) मनमाड येथे अप्पर तहसिल कार्यालय सुरु करण्याचे विभागीय आयुक्त, नाशिक यांचेकडून प्रस्ताव शासनास प्राप्त झाल्यानंतर वित्त विभागाच्या सहमतीने व शासन मान्यतेने त्यावर निर्णय घेण्याचे संकल्पित आहे.

तसेच मनमाड येथे नविन दुय्यम निबंधक कार्यालय सुरु करण्याच्या अनुषंगाने नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, नाशिक विभाग, नाशिक यांचेकडून प्राप्त अहवालानुसार, दुय्यम निबंधक नांदगाव कार्यालयात सन २०१८ ते २०२० या कालावधीत दस्त नोंदणीची संख्या ३४००-३५०० एवढी आहे. दुय्यम निबंधक कार्यालयात वर्षाला साधारणत: ८००० पेक्षा जास्त दस्त नोंदणीसाठी दाखल झाल्यास त्याक्षेत्रात नवीन कार्यालयाची निर्मिती करावी असे शासन निर्णय दिनांक २६.०२.२०१४ अन्वये धोरण निश्चित केले आहे. सदर धोरण निश्चितीनुसार मनमाड, ता.नांदगांव येथे नवीन दुय्यम निबंधक कार्यालय सुरु करण्याची कार्यवाही नियमानुसार करता आलेली नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

मौजे त्रिंबक बगाडवाडी (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) येथील भूभाग क्र.५६१ वर आकारण्यात येणा-या बिनशेती जमिन महसूलीच्या रक्कमेबाबत

(२३) ३५१०० (०७-०१-२०२२). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे त्रिंबक बगाडवाडी (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) येथील श्री. जयसिंग साटम यांनी भूभाग क्र. ५६१ वर आकारण्यात येणा-या बिनशेती जमिनीचा महसुलाच्या रक्कमेबाबत जिल्हाधिकारी यांना दिनांक १० सप्टेंबर, २०१२ व दिनांक २२ ऑक्टोबर, २०१२ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्र दिलेले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मागणी केल्याप्रमाणे त्यांना आकारण्यात येणा-या महसूल रक्कमेबाबत अद्यापपर्यंत तपशील देण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त महसूल सन १९८० या कालावधीपासून तलाठी कार्यालयातुन आकारण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त मागणीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बाळासाहेब थोरात (०४-०३-२०२२) : (१), (२), (३), (४) व (५) मौजे त्रिंबक बगाडवाडी ता.मालवण येथील भुभाग क्र.५६१ वर आकारण्यात येणाऱ्या बिनशेती जमिनीचा महसुलाच्या रक्कमेबाबत श्री.जयसिंग साटम यांनी जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांचेकडे निवेदन दिले आहे. सदर निवेदनाच्या अनुषंगाने तहसिलदार, मालवण यांनी तपासणी केली असता मौजे बगाडवाडी, ता.मालवण येथील गट नंबर ५६१ क्षेत्र ०-३४.० हे.आर क्षेत्राकरिता जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांचे दिनांक २५.१०.१९८३ च्या आदेशान्वये शैक्षणिक प्रयोजनाकरिता अकृषिक परवानगी देण्यात आली आहे. मात्र बिनशेती आकारणी बाबतची थकबाकी असल्याने याबाबत अभिलेखांची पडताळणी करुन, जागेवरील वस्तुस्थिती तसेच यापूर्वीचे आदेश पुनर्विलोकनात घेऊन प्रस्तुत प्रकरणी उचित आदेश पारित करणेबाबत जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांनी उपविभागीय अधिकारी, कुडाळ यांना निर्देश दिले आहेत.

केज (जि.बीड) तालुक्यातील पशुसंवर्धन विभागातील पदे रिक्त असल्याबाबत

(२४) ३५१२० (०७-०१-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) : सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केज (जि.बीड) विधानसभा मतदार संघातील पशुसंवर्धन विभागात जिल्हा परिषदेतंर्गत अधिकारी व कर्मचारी यांची पदे रिक्त असल्यामुळे साथीच्या रोगांमुळे जनावरांचा उपचाराविना मृत्यू होत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे सदर रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी पशुसंवर्धन व दुग्धविकास मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे दिनांक १६ जून, २०२१ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. सुनिल केदार (२५-०३-२०२२) : (१) केज (जि.बीड) तालुक्यात ८ पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१ आणि ९ पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-२ याप्रमाणे एकूण १७ स्थानिक पशुवैद्यकीय संस्था आहेत. सन २०२१ मध्ये यापैकी श्रेणी-१ दवाखान्यातील ४ पशुधन विकास अधिकारी व श्रेणी-२ दवाखान्यातील ३ पशुधन पर्यवेक्षक याप्रमाणे एकूण ७ पदे रिक्त होती.

परंतु सन २०२१-२२ वर्षात आजअखेर केज तालुक्यात साथीच्या रोगामुळे जनावरांचा मृत्यू झाला नसल्याचे जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, बीड यांनी प्रमाणित केले आहे.

(२) व (३) महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे विभागातील पशुधन विकास अधिकारी (गट-अ) पदांकरीता जाहिरात क्र. १३/२०१९ मार्फत एकूण ४३२ उमेदवारांची शिफारस शासनास करण्यात आलेली असून, यानूसार विभागामार्फत शिफारसप्राप्त उमेदवारांची पात्रता तपासणी करुन शासन निर्णय क्र. पसंप्र-२०२१/प्र.क्र २२२/पदुम-१, दिनांक ०८/०२/२०२२ अन्वये एकूण ४२८ पात्रताधारक उमेदवारांना त्यांचे चारित्र्य पडताळणी अहवाल, वैद्यकीय तपासणी अहवाल प्राप्त होण्याच्या अधीन राहून पशुधन विकास अधिकारी (गट-अ) पदावर नियुक्ती देण्यात आलेली आहे. सदर शासन निर्णयान्वये केज (जि.बीड) तालुक्यातील श्रेणी-१ दवाखान्यातील पशुधन विकास अधिकाऱ्यांची २ पदे भरण्यात आली असून, आंतर जिल्हा बदलीने श्रेणी-२ दवाखान्यातील पशुधन पर्यवेक्षकांची २ पदे भरण्यात आली आहेत व १ पद रिक्त झाले आहे. सबब सद्यस्थितीत केज (जि.बीड) तालुक्यातील एकूण ४ पदे रिक्त आहेत, सदर रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार नजिकच्या पशुधन विकास अधिकाऱ्यांकडे सोपवून शेतकऱ्यांना तसेच पशुपालकांना नियमीतपणे सेवा पुरविण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(ता.वसमत, जि.हिंगोली) मोहम्मदपूरवाडी नवीन वस्ती येथील मीन अहमदपूर वाडी वस्तीपर्यंत जाणाऱ्या शासकीय पांदण रस्त्याचे सिमेंट-काँक्रीटीकरण करण्याबाबत

(२५) ३५२१० (१७-०१-२०२२). श्री.चंद्रकांत ऊर्फ राजुभैय्या रमाकांत नवघरे (बसमत) : सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) (ता.वसमत, जि.हिंगोली) मोहम्मदपूरवाडी नवीन वस्ती येथील अंतर्गत मीन अहमदपूर वाडी वस्तीपर्यंत जाणारा शासकीय पांदण रस्त्याची दैयनिय अवस्था झाली असून या रस्त्यावरील वाहतूक बंद झाली असून रस्ता चालण्याससूध्दा अयोग्य असल्यामुळे आजारी व्यक्तींना व गरोदर स्त्रीयांना उचलून न्यावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रस्ता सिमेंट-काँक्रीटचा करण्याबाबत तेथील लोकप्रतिनिधींनी संबंधित अधिकाऱ्यांना निवेदनाद्वारे दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त रस्ता सिमेंट-काँक्रीटचा करण्याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यांत येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. संदीपानराव भुमरे (२५-०३-२०२२) : (१) होय हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे

मोहम्मदपूरवाडी नवीन वस्ती येथील गावकऱ्यांनी सदर पाणंद रस्त्याचेकाम सिमेंट-कॉक्रीट करणे संदर्भातील दिनांक २३/०८/२०२१ रोजीचे निवेदन तहसिलदार, वसमत यांना दिल्याचे दिसून येते.

(३) सदर रस्ता हा पाणंद रस्ता असून योजना बाहय आहे. शेत/पाणंद रस्त्यांच्या कामांकरीता राज्य रोहयो आणि मनरेगा यांच्या अभिसरणातुन पूरक कुशल निधी उपलब्ध करुन देण्याकरीता सुधारीत धोरण शासन निर्णय दिनांक ११/११/२०२१ अन्वये विहीत करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

शासनाच्या नव्या आदेशानुसार शेतजमीन तुकडीकरण करण्याच्या निर्बंधाबाबत

(२६) ३५४५८ (०७-०१-२०२२). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या नव्या आदेशानुसार जिरायत दोन एकर आणि बागायत २० गुंठे क्षेत्रातील जमिनीचे तुकडे करून जमीन विक्री करण्यांवर निर्बंध लादण्यात आले असल्याचे निदर्शनास आले हे खरे आहे काय

(२) असल्यास, सदर निर्णयामुळे शेतकऱ्यांना आर्थिक भुर्दंड तसेच मानसिक त्रासाला सामोरे जावे लागणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करुन सदरहू नवे नियम रद्द करण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बाळासाहेब थोरात (१५-०३-२०२२) : (१) हे अंशत: खरे आहे.
(२) व (३) महाराष्ट्र धारण जमीनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रिकरण करण्याबाबत अधिनियम १९४७ मधील तरतुदीनुसार प्रमाणभूत क्षेत्रात सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात हळद प्रक्रिया उद्योग उभारणीबाबत

(२७) ३५४६१ (०५-०१-२०२२). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात हळदीचे पिक वाढले असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निर्यातक्षम हळद उत्पादनासाठी संशोधन केंद्र तसेच प्रक्रिया महामंडळ स्थापन करण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे काय,
(३) असल्यास, उक्त उद्योगांच्या उभारणीसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दादाजी भुसे (०४-०३-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
हळद संशोधन व प्रक्रिया धोरण निश्चित करण्यासाठी मा. श्री. हेमंत पाटील, लोकसभा सदस्य, हिंगोली लोकसभा मतदारसंघ यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ७.९.२०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये अभ्यास समिती गठित करण्यात आली आहे.
(३) अभ्यास समितीचा अहवाल प्राप्त झाल्यावर पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मलठण (ता. दौंड, जि. पुणे) येथील शेतकऱ्यांच्या मेंढ्यांचा झालेला मृत्यू

(२८) ३५४८१ (०७-०१-२०२२). श्री.राहूल कुल (दौंड) : सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मलठण (ता. दौंड, जि. पुणे) येथील श्री. अंकुश रघुनाथ देवकाते यांच्या ८२ मेंढ्यांचा लाळ रोगाच्या - खुरकुत लसीकरणानंतर देखील मृत्यू झाल्याचे दिनांक १० ऑक्टोबर २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त शेतकऱ्याने नुकसान भरपाई मिळण्याबाबत विनंती केलेली असून याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी देखील मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मलठण येथील शेतकऱ्याला नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुनिल केदार (०९-०३-२०२२) : (१)अंशत: खरे आहे.

मृत मेंढयांचे शवविच्छेदन केले असता किटकनाशकाच्या विषबाधेमुळे मृत्यु झाल्याबाबत प्राथमिक निदान करण्यात आले होते. तसेच रोग अन्वेषण विभाग, औंध, पुणे यांच्या दिनांक ११.१०.२०२१ रोजीच्या अहवालानुसार PYRETHROID या प्रकारच्या किटकनाशकाने मृत मेंढ्यांचे शवविच्छेदन नमूने बाधित असल्याचे निष्पन्न झाले आहे.

(२) अशा स्वरूपाची मागणी प्राप्त झाली आहे.

(३) उक्त मेंढ्यांचा मृत्यू नैसर्गिक आपत्तीत झालेला नाही व त्यांच्या विमाकवचही उपलब्ध नाही. त्यामुळे प्रचलित धोरणानुसार नुकसान भरपाई अनुज्ञेय नाही. तथापि, पुणे जिल्हा परिषद, पुणे यांच्या सेस निधी अंतर्गत नाविन्यपूर्ण योजना, "अपघाती मृत्यू पावलेल्या पशुधनाच्या मालकास सानुग्रह अनुदान देणे" या मधून संबंधीत पशुपालकास योजनेच्या निकषाप्रमाणे नुकसान भरपाई देणे प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील पशुसंवर्धन, पदविका व पर्यवेक्षक धारकांच्या मागण्यांबाबत

(२९) ३५५२४ (०७-०१-२०२२). श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) : सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पशुसंवर्धन, पदविका व पर्यवेक्षक धारकांना भारतीय पशुवैद्यक परिषद कायदा, १९८४ च्या पहिल्या अनुसूचीत समाविष्ट करुन दिनांक ७ ऑगस्ट, २००९ ची शासन अधिसूचना रद्द करुन सुधारित अधिसूचना निर्गमित करण्यासह इतर मागण्यांसंदर्भात पशुचिकित्सा व्यवसायी संघटना, महाराष्ट्र व लोकप्रतिनिधीनी दिनांक ३० जून, २०२१ रोजी वा त्यासुमारास मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व दुग्धविकास मंत्री महाराष्ट्र राज्य यांना निवेदन दिलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी बैठक घेण्यात आली आहे काय, बैठकीअंती चर्चा करुन शासनाने कोणता निर्णय घेतला व घेण्यात आला आहे,

(३) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत?

श्री. सुनिल केदार (१५-०३-२०२२) : (१) व (२) पशुचिकित्सा व्यवसायी संघटना, महाराष्ट्र यांचे प्रलंबित मागण्यांबाबतचे निवेदन शासनास प्राप्त झाले आहे. सदर निवेदनाच्या अनुषंगाने पशुधन पर्यवेक्षक, सहायक पशुधन विकास अधिकारी व पशुसंवर्धन विभागातील कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांबाबत मा. उपाध्यक्ष, विधानसभा यांच्या अध्यक्षतेखाली दि. ०३/०८/२०२१ रोजी समितीकक्ष, विधान भवन, मुंबई येथे बैठक आयोजित करण्यात आली होती. संघटनेकडून प्राप्त निवेदनामधील मागण्यांसंदर्भात नियमानुसार तपासून कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

कृषी विभागाच्या स्व.भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेंतर्गत प्रलंबीत अनुदान वितरीत करणेबाबत

(३०) ३५६७७ (०७-०१-२०२२). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) : सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्व.भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेंतर्गत सन २०१९-२० या कालावधीत एकुण १३५ हेक्टर लागवड करण्यात आली असून लागवडीपैकी ६८ हेक्टर लागवडीचे अनुदान अद्यापपर्यंत प्रलंबीत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेमुळे पारंपारीक शेती सह शेतकरी फळबाग लागवडीकडे वळल्यामुळे सदर योजनेचे अनुदान प्रलंबीत असल्यामुळे शेतकरी अडचणीत सापडला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त योजनेतंर्गत प्रलंबीत असलेले अनुदान तात्काळ वितरीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संदीपानराव भुमरे (०८-०३-२०२२) : (१) (२) (३) हे खरे नाही.

सर्वसाधरण व अनुसूचित जाती प्रगर्वाचे अनुदान दिनांक ६.१२.२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात आलेले आहे. तसेच, अनुसूचित जमाती प्रवर्गाचा निधी कृषि विभागाकडे वर्ग करण्याबाबत आदिवासी विकास विभागाकडे विनंती करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

तौकते चक्रीवादळामुळे मच्छिमारांना आर्थिक मदत व डिझेल परतावा मिळणेबाबत

(३१) ३५६९४ (०६-०१-२०२२). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) : सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-उपनगर जिल्हयातील वेसावा मच्छिमार वि.का.स.सो.ली. या संस्थेचा माहे नोव्हेंबर, २०१८ ते एप्रिल, २०२१ या कालावधीतील तब्बल २५ महिन्यांचा सुमारे १४ लाख रुपयांचा डिझेल विक्रीकर परतावा मच्छिमारांस मिळाला नसल्याचे माहे जून, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तौक्ते चक्रीवादळामुळे मच्छिमारांच्या बोटींचे नुकसान झाल्याने हंगामातील दिवस वाया गेल्यामुळे मच्छिमारांना आर्थिक संकटांना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी मच्छिमारांना मदत मिळण्याच्या दृष्टीने तसेच प्रलंबित असलेला डिझेलचा परतावा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अस्लम शेख (१५-०३-२०२२) : (१) हे, अंशत: खरे आहे.

मुंबई उपनगर जिल्हयातील वेसावा मच्छिमार वि.का.स.सो.ली. या संस्थेचा माहे नोव्हेंबर २०१८ ते एप्रिल २०२१ या कालावधीतील सुमारे १४.४२ कोटी रुपयांचा डिझेल विक्रीकर परतावा देय असल्याचे माहे जुन, २०२१ मध्ये दिसून आले आहे.

(२) अंशत: खरे आहे.
(३) शासन निर्णय दिनांक ०३.०६.२०२१ अन्वये व दिनांक २३.०६.२०२१ अन्वये तौक्ते चक्रीवादळामुळे बाधित मच्छिमारांना नुकसानीपोटी मदत व पुनर्वसन विभागामार्फ़त रु. १२३७.७५ लाख इतके अर्थसहाय्य मंजूर करण्यात आले असून त्यानुसार रु.९२८.०६१६ लाख इतके खर्च झालेले आहेत. त्यापैकी मुंबई उपनगर जिल्ह्यातील ४७७ बाधित मच्छिमारांना ४७.३१६० लाख इतकी नुकसान भरपाई देण्यात आलेली आहे.

तसेच डिझेल तेलावरील विक्रीकराची प्रतिपुर्ती योजनेंतर्गत सन २०२१-२२ या वर्षाकरिता अर्थसंकल्पित निधी रु.६०.०० कोटी वितरित करण्यात आला असून हिवाळी अधिवेशनामध्ये पुरक मागणीद्वारे मंजूर रु.५०.०० कोटी निधी वितरित करण्याच्या अनुषंगाने विभागाकडून कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

कृषी यांत्रिकीकरण योजनेतून शेतकऱ्यांना लाभ देण्यासाठी लॉटरी पद्धत राबविण्याबाबत

(३२) ३५७०० (०७-०१-२०२२). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कृषी यांत्रिकीकरण योजनेतून शेतकऱ्यांना लाभ देण्यासाठी लॉटरी पद्धत राबविली जात असुन सदर योजनेतंर्गत निवड झालेल्या बहुतांश शेतकऱ्यांनी अवजारे घेण्यास नकार दिल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लाभार्थी शेतकऱ्यांकडून अवजारे घेण्यास नकार देण्यामागील कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदर योजना यशस्वीपणे राबविण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दादाजी भुसे (१७-०३-२०२२) : (१) अंशत: खरे आहे.
(२) चुकीच्या औजारासाठी अर्ज केल्यामुळे किंवा हंगाम संपल्यानंतर औजाराची आवश्यकता राहिली नसल्यामुळे तसेच निवड करणे गरज नसतानाही इतरांनी अर्ज केला म्हणून अर्ज केल्यामुळे व तत्सम अन्य कारणांमुळे काही शेतक-यांनी औजारे घेण्यास नकार दिलेला आहे.
(३) महाडीबीटी प्रणालीवर शेतक-यांची निवड झाल्यानंतर त्यांना महाडीबीटी प्रणालीमार्फ़त लघुसंदेश (SMS) पाठविला जातो व क्षेत्रीय यंत्रणांकडून त्यांच्याशी वैयक्तिक संपर्क साधला जातो. महाडीबीटी प्रणालीवर शेतक-यांची निवड झाल्यानंतर करावयाच्या कार्यवाहीबाबत मार्गदर्शन करणेबाबत कृषि सहाय्यकांच्या स्तरावर अनौपचारिक मेळावा घेण्याबाबत आयुक्त (कृषि) यांना कळविण्यात आले आहे.
सन २०२१-२२ मध्ये ३,७६,३१३ लाभार्थ्यांची निवड करण्यात आली असून त्यापैकी १,२९,६७८ लाभार्थी छाननी प्रक्रियेमध्ये आहेत. सदर लाभार्थ्यांपैकी ४९,८४५ लाभार्थ्यांनी देयके सादर केली असून त्यापैकी ३७,६५२ लाभार्थ्यांना रू. २२३.७९ कोटी अनुदान मंजूर करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

भिवंडी (ता.कल्याण जि.ठाणे) येथील जमिन मिळकतीचे वारस लावण्याबाबत

(३३) ३५८१५ (०७-०१-२०२२). श्री.संजय केळकर (ठाणे) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयातील तहसिलदार कार्यालय, भिवंडी विभागास मौजे लाखिवली, धामणे, सोनाळे, सरवली व ठाणे तालुक्यातील मौजे आवळा, मोघरपाडा व बाळकुम माजिवाडा येथील जमिन मिळकतीचे वारस लावणेबाबत माहे डिसेंबर, २०२० ते जानेवारी, २०२१ या कालावधीत तहसिलदार, भिवंडी, तहसिलदार, ठाणे यांना वारस दाखल करण्याकरिता अर्ज दिलेले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने कायदेशीर वारस लावत असताना संबंधितांनी वारसांची चुकीची माहिती दिल्यास किंवा वारस लपवण्याचा प्रयत्न केल्यास भादवी संहिता कलम १९८,१९९,२०० व १९३/२ मधील तरतुदीनुसार दंडास शिक्षेस पात्र राहतील असे सत्यप्रतिज्ञा देऊनही भिवंडी येथील मौजे लाखिवली, धामणे, सोनाळे, सरवली व ठाणे येथील मौजे ओवळा-मोघरपाडा व बाळकुम-माजिवडा गावांमध्ये चुकीचे अनियमित अगुणवत्तेच्या आधारावर वारस फेरफार नोंदविले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, फेरफार वारस नोंदविताना इतर वारसांची फसवणूक झाल्याने गुन्हे दाखल करण्यास किती कालावधी अपेक्षित आहे?

(४) असल्यास, सदर फेरफार रद्द करुन अर्जदारांनी दिलेल्या नवीन सत्यप्रतिज्ञानुसार वारस फेरफार नोंद करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. बाळासाहेब थोरात (२३-०३-२०२२) : (१), (२), (३) व (४) मौजे माजिवाडा, ओवळे, मोघरपाडा व बाळकुम, ता. ठाणे तसेच मौजे लाखीवली, धामणे व सरावली, ता. भिवंडी या गावांमध्ये माहे डिसेंबर २०२० ते माहे जानेवारी २०२१ या कालावधीमध्ये वारस नोंदीसाठी एकूण १३ अर्ज प्राप्त झाले आहेत. त्यापैंकी ८ अर्ज मंजूर करण्यात आले असून ५ अर्ज नामंजूर करण्यात आलेले आहेत.

वारसांबाबत प्राप्त होणा-या अर्जाच्या अनुषंगाने गाव नमुना नं. ७/१२ सदरी असलेल्या मयत खातेदारांच्या वारसांची संबंधित तलाठी यांचेकडून चौकशी करण्यात येवून महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील तरतुदीनुसार सर्व संबंधितांना नोटिसा देवून नियमानुसार फेरफार नोंदीची कार्यवाही करण्यात येते. सदरचा फेरफार मान्य नसल्यास, त्याविरुध्द सक्षम प्राधिकारी यांचेकडे अपिल दाखल करण्याची तरतूद महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मध्ये असल्याचे संबंधितांना कळविण्यात येते. त्याप्रमाणे उक्त नमुद काही गावांमधील फेरफार संदर्भात प्राप्त झालेल्या अर्जाबाबत अर्जदार यांना संबंधित फेरफार मान्य नसल्यास, त्याविरुध्द सक्षम प्राधिकारी यांचेकडे अपिल दाखल करण्याचे कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

देवळा (जि.नाशिक) तालुक्यात एका हॉटेलमध्ये अल्पवयीन तरुणाने आत्महत्येचा प्रयत्न केल्याबाबत

(३४) ३५८६० (१०-०१-२०२२). डॉ.राहूल आहेर (चांदवड) : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवळा (जि.नाशिक) तालुक्यात व्हाटसअॅपवर स्टेटस ठेवत एका हॉटेलमध्ये अल्पवयीन तरुणाने माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान आत्महत्येचा प्रयत्न केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हॉटेलमध्ये प्रवेश देतांना व्यवस्थापनाने कुठलाही ओळखीचा पुरावा न घेता तसेच रजिस्टरमध्ये नोंद न करता सदर तरुणास प्रवेश दिला तसेच उक्त हॉटेलमध्ये अनेक वर्षांपासून अनैतिक कामे चालत असल्याची घटना निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी उक्त व्यवस्थापनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिलीप वळसे-पाटील (१०-०३-२०२२) : (१) हे खरे आहे.

(२) व (३) हॉटेलमध्ये प्रवेश करताना सदर तरुणाचे आधारकार्ड घेण्यात आले तसेच हॉटेल रजिस्टरमध्ये त्याची नोंद घेण्यात आली. सदर हॉटेलमध्ये अनैतिक कामे चालत असलेबाबत पोलीस स्टेशनचे अभिलेखावर गुन्हे दाखल नाहीत.

सदर हॉटेलचे मालक यांना शासकीय आदेशाचे उल्लंघन करुन हॉटेलची रुम काही काळ वास्तव्यासाठी उपलब्ध करुन दिल्याने त्यांच्याविरुध्द देवळा पोलीस स्टेशनमध्ये दिनांक १४.१०.२०२१ रोजी गु.र.नं.१२८/२०२१ भादंवि कलम ११४, १८८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरचा गुन्हा पोलीस तपासावर आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

वाघोली (ता.हवेली जि.पुणे) येथे अप्पर तहसिल कार्यालय निर्माण करण्याबाबत

(३५) ३५८७९ (१०-०१-२०२२). श्री.चेतन तुपे (हडपसर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाघोली (ता.हवेली जि.पुणे) तालुक्यातील पूर्व हवेली येथील नागरीकांची महसूलासंदर्भातील कामे वेळेत होण्यासाठी अप्पर तहसिल कार्यालय निर्माण करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी अप्पर मुख्य सचिव व विभागीय आयुक्त, पुणे यांच्याकडे दिनांक २७ फेब्रुवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी अप्पर तहसिल कार्यालय निर्माण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बाळासाहेब थोरात (०७-०४-२०२२) : (१), (२) व (३) पुणे जिल्हयातील हवेली तालुक्यातील तहसिल कार्यालयाचे विभाजन करुन पुर्व हवेली भागासाठी अपर तहसिलदार यांचे नविन कार्यालय सुरू करण्यास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे. सदरचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

राज्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पिक विमा कंपनीकडून
नुकसान भरपाईच्या होणाऱ्या विलंबाबाबत

(३६) ३५८९१ (०७-०१-२०२२). श्री.बबनराव शिंदे (माढा) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळण्यासाठी हवामान आधारीत पीक विमा योजना राबविण्याचे धोरण शासनाकडून अवलंबिले जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे ऑगस्ट व सप्टेंबर या महिन्यांत झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाले असुन नदीचे पाणी मोठ्या प्रमाणात सोडल्याने पुर परिस्थिती निर्माण होवुन शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सुमारे ३३ लाख नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी तक्रारी नोंदविल्या असुन त्यापैकी २० लाख तक्रारींची विमा कंपनीकडून सर्वेक्षण करण्यात आलेले असून १३ लाख तक्रारींचे सर्वेक्षण प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार संबंधीत शेतकऱ्यांना पीक विमा मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दादाजी भुसे (१५-०३-२०२२) : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

राज्यात माहे जुलै ते सप्टेंबर २०२१ मधील अतिवृष्टी व पुरामुळे शेतीपिके/फळपिकांचे एकूण ५२.७९ लाख हे. क्षेत्र बाधित झाले आहे.

(३) हे खरे नाही.

खरीप हंगाम २०२१ राज्यात प्रधानमंत्री पिक विमा योजनेअंतर्गत स्थानिक नैसर्गिक आपत्ती या बाबी अंतर्गत ४२.९६ लाख शेतकरी अर्जदारांचे पूर्वसुचना प्राप्त झाल्या असून सर्वेक्षण पुर्ण करण्यात आले आहे.

(४) प्रधानमंत्री पिक विमा योजनेअंतर्गत खरीप हंगाम २०२१ मध्ये स्थानिक नैसर्गिक आपत्ती या बाबी अंतर्गत राज्यात एकूण ४२.९६ लाख पूर्वसूचना दाखल झाल्या असून ४२.९६ लाख पूर्वसूचनांचे सर्वेक्षण पूर्ण झाले आहे. त्यापैकी पात्र ३८.९४ लाख अर्जदारांचे रक्कम रु. २३८९.८६ कोटी नुकसान भरपाई निश्चित करण्यात आली असून त्यापैकी ३६.३३ लाख शेतकरी अर्जदारांना नुकसान भरपाई रक्कम रु. २२३०.४७ कोटी वाटप करण्यात आले असून उर्वरीत नुकसान भरपाई वाटपाची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

सोलापूर जिल्ह्यात गेल्या दोन वर्षापासून वाळू लिलाव बंद असल्याबाबत

(३७) ३६०५३ (०७-०१-२०२२). श्री.विजयकुमार देशमुख (सोलापूर शहर उत्तर), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यात मागील दोन वर्षापासून वाळू लिलाव प्रक्रिया झालेली नसल्यामुळे महसुलावर परिणाम झाला असुन वाळू उपलब्ध नसल्याने शासकीय व खाजगी बांधकामावर परिणाम होत असल्याचे दिनांक ४ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाळू उपसा बंद असल्यामुळे वाळू माफियांचा बेकायदेशीर वाळू उपसा, रात्रीच्या वेळी सुरु असलेल्या वाहतुकींचा गोंधळ, महसुल अधिकारी व पोलिस कर्मचा-यांवरील प्राणघातक हल्ले, माहे एप्रिल, २०२० ते मार्च, २०२१ या कालावधीत सुमारे १११८ अनाधिकृत प्रकरणावर कारवाई दाखल, वाळू अभावी शासकीय, निमशासकीय कामासह गोरगरीबांच्या घरकुलांची कामे प्रलंबित असल्याचे माहे सप्टेंबर २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत,

(४) असल्यास, गोरगरिबांच्या घरकुल बांधकामासाठी जप्त केलेल्या वाळूचा लिलाव न करता शासन निर्णयानुसार मोफत ५ ब्रास वाळू देण्याबाबत वाळू तस्करी करणाऱ्या संबंधित वाळू माफियांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. बाळासाहेब थोरात (२८-०२-२०२२) : (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) सोलापूर जिल्ह्यातील अनधिकृत वाळू उपसा रोखणेकामी जिल्हास्तरावर/ उपविभागीय स्तरावर तसेच तालुकास्तरावर नियुक्त करण्यात आलेल्या दक्षता पथकांमार्फत तसेच पोलीस व परिवहन विभागाकडून वेळोवेळी कडक मोहिम राबविण्यात येते. त्यानुसार सोलापूर जिल्ह्यात महसूल व पोलीस विभागाकडून दि.१/४/२०२० ते दि.३१/३/२०२१ या कालावधीत गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीच्या १११८ प्रकरणी कारवाई करुन ७०२ गुन्हे व ११४३ आरोपींना अटक करण्यात आली असून जप्त केलेल्या १८२०.४८ ब्रास वाळूचा लिलाव करून त्यामधून रु.७२.२९ लाख इतका महसूल शासनास प्राप्त झाला आहे. तसेच दि.१/४/२०२१ ते दि.३१/१०/२०२१ या कालावधीत जप्त केलेल्या ८३८.९९ ब्रास वाळूचा लिलाव करुन त्यामधून रु.३५.१८ लाख इतका महसूल शासनास प्राप्त झाला आहे.

शासकीय, निमशासकीय तसेच घरकुलांची कामे पूर्ण करण्यासाठी जप्त केलेला वाळूसाठा शासकीय दराने उपलब्ध करुन देण्याची प्रक्रिया सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

गंगाखेड (जि.परभणी) पोलिस निरीक्षक यांनी कर्तव्यात कसूर केल्याने निलंबाची कारवाई करण्याबाबत

(३८) ३६०८१ (१०-०१-२०२२). श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड) : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गंगाखेड (जि.परभणी) येथील पोलिस निरीक्षक यांनी कर्तव्यात कसूर केल्याबद्दल त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी (गंगाखेड) यांनी दिनांक ३१ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास गृहमंत्री, महाराष्ट्र राज्य व विधानसभा अध्यक्ष तसेच अप्पर मुख्य सचिव, गृह तथा पोलिस महासंचालक यांनी निवेदन देऊन मागणी केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीनुसार संबंधीत पोलिस निरीक्षक यांची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीनुसार संबंधीत अधिकाऱ्याला निलंबित करण्यात आले आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिलीप वळसे-पाटील (०६-०४-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी पोलीस निरीक्षक यांच्याविरुध्द करण्यात आलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने अपर पोलीस अधीक्षक, परभणी यांचे मार्फतीने चौकशी करण्यात येत असून या प्रकरणी प्रथम दर्शनी तक्रारीतील आक्षेपामध्ये तथ्य नसल्याचे चौकशीत निदर्शनास आले असून अधिक चौकशी सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

सोलापूर जिल्हा औद्योगिक सहकारी बँकेत मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याबाबत

(३९) ३६०९८ (१०-०१-२०२२). श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) : सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हा औद्योगिक सहकारी बँकेचे ३ कोटी ५० लाख व इतर व्यापारी,सोसायटी व ग्राहक देणे ३ कोटी ५० लाख व शासकीय देणी २४ लाख या रक्कमाच्या परतफेडीसाठी संस्थेने १८ हजार चौ.फुट जागा विक्रीच्या प्रस्तावास २२ वर्षापूर्वीचा पत्राचा आधार घेवून प्रादेशिक वस्त्रोद्योग उपायुक्त विक्रीस परवानगी देवून मोठया प्रमाणात गैरव्यवहार झाल्याप्रकरणी चौकशी होणेबाबत निवेदन कामगार संघटनेने दिनांक ३१ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्या सुमारास निवासी उपजिल्हाधिकारी, सोलापूर यांना दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीत काय निष्पन्न झाले,

(३) असल्यास, संबंधित दोषींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. अस्लम शेख (२४-०३-२०२२) :१)कामगार संघटनेने दिनांक ३० ऑगस्ट, २०२१ रोजी जिल्हाधिकारी सोलापूर यांना सोलापूर जिल्हा विणकर सहकारी फेडरेशन या संस्थेची केलेली विक्री रद्द करुन यास जबाबदार असणा-या संचालक मंडळ व अधिका-यांवर कायदेशीर कारवाई करणेबाबत निवेदन दिले आहे, हे खरे आहे.

(२) होय. सदर संस्थे विरुध्द प्राप्त झालेल्या तक्रारीबाबत प्रादेशिक उपआयुक्त तथा निबंधक, रजिस्ट्रार ऑफ सहकारी संस्था, सोलापूर यांनी रितसर चौकशी केली आहे. चौकशी अहवालात सदर संस्थेने रितसर परवानगी घेऊन मालमत्तेची विक्री करुन प्राप्त झालेल्या रक्कमेतून शासकीय भागभांडवल रु.२४.००/-लाख संपूर्ण परतफेड केलेली आहे. सोलापूर जिल्हा औद्योगिक सहकारी बँकेचे देणे व इतर व्यापारी, सोसायटी, ग्राहक देणीही परतफेड केली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) लागू नाही.

गडचिरोली जिल्हयातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळण्याबाबत

(४०) ३६११२ (०७-०१-२०२२). श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्हयात खरीप हंगाम २०२१ मध्ये धान पिका ऐवजी गाद तनाची उगवण झाल्याने धान पिकाच्या उत्पन्नात घट झाल्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नुकसानग्रस्त पिकांचे सर्व्हे करुन नुकसान भरपाईचा अहवाल शासनाला सादर करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २२ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी, गडचिरोली यांना निवेदनाद्वारे कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. दादाजी भुसे (१५-०३-२०२२) : (१) हे अंशत: खरे आहे.

गाद हे तन नसून, गाद माशीचा प्रादुर्भाव निदर्शनास आला आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सदर निवेदनानुसार गडचिरोली जिल्हयातील आरमोरी, वडसा, कुरखेडा, कोरची तालुक्यात तालुका कृषि अधिकारी यांचेमार्फत तपासणी केले असता गाद तनाऐवजी जुलै / ऑगस्ट मध्ये गादमाशीचा प्रादुर्भाव दिसून आला होता. परंतु गादमाशी व इतर किड रोगांच्या नियंत्रणासाठी वडसा उपविभागात वडसा, आरमोरी, कुरखेडा व कोरची तालुक्यात तसेच जिल्हयातील प्रत्येक गावात किड-रोग नियंत्रणाबाबत मार्गदर्शन करण्यात आले. त्यामुळे सदर किड-रोग नियंत्रणात आला.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे चिचारी (ता.संग्रामपुर, जि.बुलढाणा) येथे कोट्यावधी रुपयांच्या भूखंड जमीनीच्या घोटाळ्याबाबत

(४१) ३६१२१ (०७-०१-२०२२). श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे चिचारी (ता.संग्रामपुर, जि.बुलढाणा) येथील गट नं.१ ते ७ व ३३ ते ४८ अशा एकूण ३९७ हेक्टर क्षेत्रफळ असलेल्या २२ गटांचे एकत्रीकरण तहसीलदार, संग्रामपुर यांनी आदेश क्र.२००६ अन्वये करुन नवीन नोंद गट नं.१ क्षेत्रफळ ३९७ हेक्टर केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गट आदिवासी लोकांच्या मालकीचा असुन ३६ व ३६ (अ) कलम लागु झालेला असल्याने सन २०१६ पर्यंत सदर गटामध्ये कोणतेही खरेदी खत किंवा सक्षम दस्तावेज नसताना नोंदणीमध्ये फेरफार करुन ५९ गैरआदिवासी लोकांची बोगस नावे ५७ हेक्टर क्षेत्रफळाच्या सातबारामध्ये घेतल्यामुळे ३९७ हेक्टर मूळ क्षेत्रफळामध्ये वाढ होऊन ४५७ हेक्टर झाल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासकीय नोंदीच्या क्षेत्रफळामध्ये झालेली वाढ मूळ क्षेत्रफळाशी जुळण्यासाठी नायब तहसीलदार, संग्रामपूर यांनी कलम १५५ अंतर्गत केलेल्या आदेशामध्ये गैरआदिवासी खातेदारांचे क्षेत्रफळ कमी न करता आदिवासी लोकांच्या नावे असलेल्या जमिनी कमी करुन गैरआदिवासी लोकांच्या नावे जमिनी कायम ठेवल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी तक्रारी प्राप्त झाल्यानंतर पालकमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या निदेशानुसार जिल्हाधिकारी, बुलढाणा यांनी दिनांक १२ फेब्रुवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास त्रिसदस्य समिती नेमून १५ दिवसात अहवाल सादर करण्याचे आदेश देऊनही कोणतीही कार्यवाही न करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बाळासाहेब थोरात (११-०३-२०२२) : (१) होय,

मौजे चिचारी, ता. संग्रामपुर, जि. बुलडाणा येथील गट नं. १ ते ७ व ३३ ते ४८ अशा गटाचे एकुण क्षेत्र ३९७ हे.आर असलेल्या २२ गटांचे एकत्रीकरण हे तालुका निरीक्षक भुमी अभिलेख जळगांव जामोद यांनी त्याचे कार्यालयीन पत्रक्र./अभिलेख/दुरुस्ती/अ.क./०५/संग्रामपुर/ दिनांक १०/१०/२००५ नुसार कार्यवाही करण्यात आली.

(२) हे अंशत: खरे आहे,

मौजे चिचारी येथील गट नं.१ मधील मुळ क्षेत्रफळ एकुण ३९७ हे.आर चा असल्याने मुळ ७/१२ चे अवलोकन केल्यानंतर खातेदाराचे नावासमोर असलेल्या क्षेत्रफळाची बेरीज केली असता ती ४५४.८५ हे.आर क्षेत्र झालेले दिसुन आल्याने क्षेत्रफळात वाढ झालेली होती. त्यामुळे तत्कालीन तहसिलदार, संग्रामपुर यांनी प्रकरण पंजीबध्द करुन प्र.क्र.आर.टी.एस-६४/चिचारी/७१/२०१६-१७ मध्ये सर्व खातेदारांना नोटीस काढुन ज्या खातेदाराचे क्षेत्रफळ वाढले त्यांचे क्षेत्रफळ दुरुस्ती करण्याबाबत तहसिलदार, संग्रामपुर यांनी दिनांक ०३/१२/२०१८ आदेश पारित करुन मुळ ७/१२ हा ३९७ हे.आर क्षेत्रफळाचा केला.

(३) ज्या खातेदारांचे क्षेत्रफळामध्ये तफावत आढळुन आले त्यांचे क्षेत्रफळ दुरुस्ती करण्यात आले.

(४), (५) समिती सदस्य उपविभागीय अधिकारी असून प्रशासकीय कामकाज, कोव्हिड-१९ ची दुसरी लाट, प्रकरणातील गुंतागुंत यामुळे अहवाल सादर करण्यास विलंब झालेला आहे.
सद्यस्थितीत चौकशी समितीचा अहवाल, न्यायप्रविष्ठ असलेल्या अपिल प्रकरणामध्ये योग्य निर्णय घेण्यासाठी उप विभागीय अधिकारी, जळगांव-जामोद यांचेकडे पाठविण्यात आलेला आहे.

मौजे हटवांजरी (ता.मारेगाव, जि.यवतमाळ) येथील भूमि अभिलेख कार्यालयात चुकीची मोजणी केल्याबाबत

(४२) ३६१७९ (०७-०१-२०२२). श्री.मदन येरावार (यवतमाळ), श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे हटवांजरी (ता.मारेगाव, जि.यवतमाळ) येथील श्री. देवराव लटारी फरताडे यांची सिंचन प्रकल्पासाठी शासनाने संपादित केलेल्या जमिनीच्या मिळालेल्या मोबदल्यातून त्यांनी मार्डी गावाजवळील हिवरा (मजरा) येथे ३ एकर शेत खरेदी केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भूमि अभिलेख कार्यालयाने खरेदी केलेल्या शेताची चुकीच्या पध्दतीने मोजणी शिट तयार केल्याने सदर शेतकऱ्याने सुधारण्यासाठी भूमिअभिलेख कार्यालयात वारंवार येवुन सुध्दा अधिकाऱ्यांनी त्यांच्या मागणीची कुठलीही दखल न घेतल्याने त्यांनी दिनांक २७ जुलै, २०२१ रोजी वा त्यासुमारास वैतागून विषारी द्रव्य प्राशन केल्याने त्याचा मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, खरेदी केलेल्या शेतीच्या मोजणीसाठी मृत श्री.फरताडे यांनी साडेचार हजार रुपये चलनाद्वारे शुल्क भरलेले असताना भूमापक यांनी सदर जमिनीची मोजणी वादग्रस्त केल्याचे शेती लगतच्या सर्व खातेदाराच्या उपस्थितीत पार पडलेल्या या कारवाईत मोजणी शिटवर तीन हिस्से दाखविल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, भूमिअभिलेख विभागात दलालांचे नेटवर्क असल्याने शेतजमीनीचा कायदेशीर मालकी हक्क प्रस्थापित करण्यासाठी शेतकऱ्यांना कार्यालयात वारंवार जावे लागत असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर प्रकरणातील दोषी असणारे भुमापक व इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बाळासाहेब थोरात (२१-०३-२०२२) : (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
मौजे हिवरा मजरा, ता. मारेगांव, जि. यवतमाळ येथील गट नं. ६९ चे मोजणी करीता अर्जदार श्री. वासुदेव कृष्णा एकरे व इतर धारक यांनी उप अधिक्षक, मारेगांव यांचेकडे नियमीत पोट हिस्सा मोजणीबाबत दिनांक २९.६.२०१९ रोजी अर्ज सादर केला होता. सदर मोजणी दिनांक २४.२.२०२० रोजी अर्जदार व सहधारक यांनी दाखविलेल्या वहिवाटीप्रमाणे कार्यालयाचे भूमापक यांनी मोजणी काम केले व कार्यालयाकडून मोजणी शिटची क प्रत

देण्यात आली. त्यानंतर अर्जदार श्री. वासुदेव ऐकरे यांनी केलेल्या तक्रारीनुसार पुन्हा मोका चौकशी करण्यात आली व अर्जदार यांचे मागणीप्रमाणे पुर्वीची मोजणी शिट रद्द करण्यात येवून नविन मोजणी शिट निर्गमित करण्यात आली आहे. मात्र गट नं. ६९/४ ची दस्त नोंदणी दिनांक ६.६.२०१९ रोजी श्री. फरताडे यांचे नावे झाली असल्याचे दिसून येते. तथापि, गट नं.६९ च्या मोजणीशी श्री. फरताडे यांचा कोणताही संबंध दिसून येत नाही.

(३) हे खरे नाही.

मौजे हिवरा ता. मारेगांव जि. यवतमाळ येथील गट नं. ६९/४ चे हद्द कायम मोजणी करीता दिनांक १५.६.२०२१ रोजी अर्जदार मृत श्री. फरताडे यांनी मोजणी करीता रू. तीन हजार फी चा भरणा केला होता. त्याची ई-मोजणी आज्ञावली नुसार दिनांक ४.९.२०२१ ही मोजणीची तारीख होती. सदर मोजणी नियोजनात बदल करून दिनांक १२.८.२०२१ रोजी मोजणी करण्यात आली. मोजणीवेळी श्री. फरताडे हे मयत असल्याने त्यांच्या वतीने त्याची पत्नी श्रीमती मनीषा फरताडे यांनी सदर मोजणीच्या खुणा मान्य असुन कोणतीही तक्रार नसल्याचे जबाबात नमूद केले आहे.

(४) हे खरे नाही.

(५) मौजे हिवरा मजरा, ता. मारेगांव, जि. यवतमाळ येथील गट नंबर ६९ या मिळकतीची नियमीत पोट हिस्सा मो.र.क्र.२०६८/सा.पो.ही./२०१९ अन्वये दिनांक २४/०२/२०२० रोजी करण्यात आलेली सदोष पोट हिस्सा मोजणी करणारे भुकरमापक व मोजणी कायम करणारे छाननी लिपीक, तत्कालीन निमतानदार, उप अधीक्षक भूमी अभिलेख, मारेगांव यांचे विरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ अन्वये शिस्तभंगाची कार्यवाही करणेत येत आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

चिंचोली लिंबाजी (ता.कन्नड, जि.औरंगाबाद) येथील पशुवैद्‌यकिय दवाखान्यातील पशुवैद्‌यकिय अधिकारी पद भरण्याबाबत

(४३) ३६३५७ (०७-०१-२०२२). श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड) : सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिंचोली लिंबाजी (ता.कन्नड, जि.औरंगाबाद) येथील पशुवैद्‌यकिय दवाखान्यात काहि दिवसांपासून पशुवैद्‌यकिय अधिकारी उपलब्ध नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पशुवैद्‌यकिय दवाखान्यात कृत्रिम रेतन सेवा खंडीत झाल्यामुळे शेतक-यांना आपल्या जनावरांसाठी खाजगी दवाखान्यात कृत्रिम रेतन करावे लागत असल्याने शेतक-यांवर आर्थिक अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्याअनुंषगाने उक्त पशुवैद्‌यकिय दवाखान्यात पशुवैद्‌यकिय अधिकारी पद भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुनिल केदार (२२-०३-२०२२) : (१) नियतकालीक बदलीच्या कारणामुळे पशुवैद्यकीय दवाखाना, चिंचोली लिंबाजी (ता. कन्नड, जि. औरंगाबाद) येथील पशुधन विकास अधिकारी हे पद रिक्त होते.

(२) अशी बाब निदर्शनास आली नाही. पशुवैद्यकीय दवाखाना, चिंचोली लिंबाजी (ता. कन्नड, जि. औरंगाबाद) येथील रिक्त पशुधन विकास अधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार नजिकच्या पशुधन विकास अधिकाऱ्यांकडे सोपवून शेतकऱ्यांना तसेच पशुपालकांना नियमीतपणे सेवा पुरविण्यात आल्या आहेत.

(३) शासन आदेश क्र. पसंप्र-२०२१/प्र.क्र२२२/ पदुम-१, दि. ०८/०२/२०२२ अन्वये एकूण ४२८ पात्रताधारक उमेदवारांना सरळसेवा भरतीने पशुधन विकास अधिकारी (गट-अ) संवर्गात नियुक्ती देण्यात आलेली आहे. सदर शासन निर्णयान्वये पशुवैद्यकीय दवाखाना, चिंचोली लिंबाजी (ता. कन्नड, जि. औरंगाबाद) येथील रिक्त पद भरण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

सोलापूर जिल्हयासाठी गृहनिर्माण संस्थेमधील सभासदांचा रुपांतराचे अधिमुल्य ०.१ टक्के अथवा विनामुल्य करण्याबाबत

(४४) ३६३७८ (१०-०१-२०२२). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोगवटदार वर्ग-२ आणि भाडेपट्टयाने प्रदान केलेल्या जमीनी भोगवटदार वर्ग-१ मध्ये रुपांतरीत करणे, नियम २०१८ नूसार सहकारी गृहनिर्माण संस्थाना कब्जे हक्काने प्रदान केलेल्या व त्यांच्या भोगवटयात असलेल्या जमिनी प्रचलित वार्षिक विवरण पत्रातील दराप्रमाणे येणा-या किंमतीच्या १५% एवढी रक्कम भरावी लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, कब्जे हक्काच्या रक्कमेमध्ये कोणतीही सवलत न देता पुर्ण करणे, हक्काची रक्कम वसूल करुन रहिवास प्रयोजनासाठी कब्जे हक्काने प्रदान करण्यात आलेल्या भुखंडाचा धारणाधिकार भोगवटदार वर्ग- १ मध्ये रुपांतरीत करतांना अशा जमिनीच्या प्रचलित वार्षिक दर विवरण पत्रातील दराप्रमाणे येणा-या किंमतीच्या १०% इतकी रक्कम अधिमुल्य म्हणून आकारण्यात यावी असेही आदेशात नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने ठरवून दिलेला वार्षिक दर विवरण पत्रातील दराच्या १५/१० टक्के रक्कम संस्थेतील सभासदांना आर्थिकदृष्टया भरणे शक्य नसल्याने सोलापूर जिल्हयात एकाही गृहनिर्माण संस्थेने प्रस्ताव सादर केलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मुंबईप्रमाणे सोलापूर जिल्हयासाठी गृहनिर्माण संस्थेमधील सभासदांसाठी रुपांतराचे अधिमुल्य ०.१ टक्के अथवा विनामुल्य करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बाळासाहेब थोरात (०४-०४-२०२२) : (१) होय हे खरे आहे.

राज्यात शासनाने भोगवटादार वर्ग-२ आणि भाडेपट्टयाने प्रदान केलेल्या शासकीय जमीनीचे धारणाधिकार भोगवटादार वर्ग-१ मध्ये रुपांतरीत करणे बाबत दिनांक ८ मार्च, २०१९ नियम २०१९ नूसार सहकारी गृहनिर्माण संस्थाना कब्जे हक्काने प्रदान केलेल्या व

त्यांच्या भोगवटयात असलेल्या जमिनी प्रचलित वार्षिक दर विवरण पत्रातील दराप्रमाणे येणाऱ्या किंमतीच्या १५% एवढी रक्कम भरावी अशी तरतूद आहे.

(२) होय हे खरे आहे.

तसेच, कब्जेहक्काच्या रक्कमेमध्ये कोणतीही सवलत न देता पुर्ण करणे, कब्जेहक्काची रक्कम वसूल करून रहिवास प्रयोजनासाठी कब्जेहक्काने प्रदान करण्यात आलेल्या भुखंडाचा धारणाधिकार भोगवटादार वर्ग-१ मध्ये रुपांतरीत करतांना अशा जमिनीच्या प्रचलित वार्षिक दर विवरण पत्रातील दराप्रमाणे येणाऱ्या किंमतीच्या १०% इतकी रक्कम अधिमुल्य म्हणून आकारण्यात यावी अशी तरतूद आहे.

(३) हे खरे नाही,

शासकीय जमिनीवरील गृहनिर्माण संस्थेस प्रदान केलेली जमीन भोगवटादार वर्ग-१ करणेबाबत एक प्रस्ताव प्राप्त झालेला आहे.

(४) अशा प्रकारचा कोणताही प्रस्ताव शासनस्तरावर विचाराधीन नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

ठाणे जिल्हयात पोलीस, महसूल विभाग व जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकाऱ्यांच्या संगनमताने कोटयवधी रूपयांचा अवैध वाळू व रेतीचा उपसा होत असल्याबाबत

(४५) ३६४०१ (१०-०१-२०२२). श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण, भिवंडी, मीरारोड, भाईंदर, मुंब्रा, वसई (जि.ठाणे) या ठिकाणी महसूल व पोलीस विभाग तसेच शासकीय अधिकारी व कर्मचारी आर्थिक फायद्यासाठी बेकायदेशीर वाळू व रेती उपसाकरिता वाळू माफियांना नियमबाहयरित्या सहाय्य करीत असल्याचे माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रेती व वाळू माफियांकडून मुंब्रा रेल्वे स्थानक परिसरात अवैध वाळू व रेती उपसा केला जात असल्यामुळे रेल्वे मार्गाच्या दुतर्फा असलेल्या खारफुटीच्या झाडांची अवैध तोड करण्यात येत असून उत्खननाकरिता मुंब्रा रेल्वे स्थानक परिसरातील रेल्वे लाईन तसेच रेल्वे फलाटाच्या दुतर्फा मोठे खड्डे खोदण्यात आले असल्यामुळे तेथे अपघात होवून जीवित हानी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू रेती उत्खननावर कारवाई करण्याबाबत लाईफ इन लाइट या संस्थेने माहे २०२१ मध्ये वा त्या दरम्यान जिल्हाधिकारी, ठाणे यांना निवेदने सादर करुनही अद्याप कोणतीच कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू रेती व वाळू उत्खननाबाबतची छायाचित्रे, उत्खननाचा दिनांक व उत्खनन करणाऱ्यांची नावे याबाबतचा अर्ज लाईफ इन लाइट या संस्थेने जिल्हाधिकारी, ठाणे यांना देवूनही केवळ काही लाखांचे साहित्य जप्त व नष्ट करण्याची कारवाई केली असुन अवैध उत्खनन करणाऱ्यांवर कोणताच फौजदारी व दंडात्मक कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, अवैध रेती व वाळू उत्खननाबाबत शासनाकडे व संबंधित स्थानिक प्राधिकरणांकडे वारंवार तक्रारी देवूनही हेतु:पुरस्सरपणे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित पोलीस,

महसूल तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातील सर्व जबाबदार अधिकाऱ्यांचे आर्थिक हितसंबंध असल्याने याप्रकरणातील संबंधित सर्व अधिकारी व कर्मचारी यांचेवर कठोर कारवाई करण्याबाबत तसेच त्यांच्या मालमत्तेची चौकशी व तपासणी करुन अवैधरित्या होत असलेल्या वाळू व रेती उपसाला प्रतिबंध करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबची कारणे काय आहेत ?

श्री. बाळासाहेब थोरात (०७-०३-२०२२) : (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) लाईफ इन लाईट या संस्थेने दिनांक ६/४/२०२१ रोजीच्या अर्जान्वये जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे ठाणे जिल्ह्यात होणाऱ्या अवैध रेती उत्खननाबाबत तक्रार दाखल केली होती. सदर तक्रार अर्जानुसार तहसिलदार, ठाणे व भिवंडी यांचेमार्फत कारवाई करण्यात आली आहे.

(५) ठाणे जिल्ह्यातील अनधिकृत वाळू उपसा रोखणेकामी जिल्हास्तरावर/उपविभागीय स्तरावर तसेच तालुकास्तरावर नियुक्त करण्यात आलेल्या दक्षता पथकांमार्फत दिनांक ८/८/२०२० ते २८/१०/२०२१ या कालावधीत अनधिकृत वाळू उत्खनन प्रकरणी ७४०.५१ लाख किंमतीची यंत्र सामुग्री/वाळू जप्त/नष्ट करण्यात आली आहे. तसेच १० गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तर पोलीस विभागामार्फत माहे जानेवारी, २०२१ ते नोव्हेंबर, २०२१ या कालावधीत अनधिकृत वाळू उपसा प्रकरणी ७ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

अंबाजोगाई (जि. बीड) शहरात कायमस्वरूपी कार्यालय सुरू करण्याबाबत

(४६) ३६४२२ (०२-१२-२०२१). श्रीमती नमिता मुंदडा (केज) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजोगाई (जि. बीड) येथील महाबीजचे कार्यालय शहराबाहेर असल्यामुळे शेतकऱ्यांसाठी अडचणीचे ठरत असून सदरील कार्यालय अंबाजोगाई शहरात करण्यासह इतर मागण्यांसाठी श्री. नंदकिशोर मुंदडा यांनी दिनांक २७ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास उपोषण करून संबंधित विभागास निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अंबाजोगाई शहरात सदर कार्यालय सुरू करण्याचे आश्वासन श्री. आर. एम. मदने, जिल्हा व्यवस्थापक, महाबीज कार्यालय, बीड यांनी दिनांक ३० जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास देवुन श्री. नंदकिशोर मुंदडा यांची भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा करून सदरचे उपोषण सोडवले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाबीज व्यवस्थापनाने आणखी मनुष्यबळ उपलब्ध करून देवुन महाबीज कार्यालय व गोदामाकरिता शासकीय भूखंड उपलब्ध करून दिल्यास अंबाजोगाई शहरात कायमस्वरूपी कार्यालय सुरू केल्यास बीजोत्पादक, शेतकरी व बियाणे विक्रेते यांची होणारी अडचण कायमस्वरूपी सुटेल अशी माहिती श्री. आर. एम. मदने, जिल्हा व्यवस्थापक, महाबीज, बीड यांनी दिनांक ३० जानेवारी २०१८ रोजी वा त्यासुमारास पत्रान्वये उप विभागीय

दंडाधिकारी, अंबाजोगाई आणि महाव्यवस्थापक (प्रशासन) महाबीज, अकोला यांना कळविली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अंबाजोगाई शहरात कायमस्वरूपी कार्यालय सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दादाजी भुसे (१७-०३-२०२२) : (१) होय, हे खरे आहे
(२) होय, हे खरे आहे
(३) होय, हे खरे आहे
(४) अंबाजोगाई जि. बीड येथे तालुका बीज गुणन केंद्राची २२०.२४ हे. प्रक्षेत्र स्थावर मालमत्ता आहे. सदरचे संपूर्ण क्षेत्र दिनांक ०४/१२/१९७३ च्या शासन निर्णयान्वये वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठास लीज तत्वावर देण्यात आली आहे. सदर जागेमधील सीताफळ संशोधन केंद्रातील काही भाग महाबीजला देण्याबाबत प्राथमिक स्तरावरील छाननी सुरु आहे. सदर छाननीअंती महाबीज महामंडळास जमीन वितरीत करण्याची कार्यवाही महसूल व वन विभागाच्या मान्यतेने करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

महाराष्ट्र राज्यात ऑनलाईन रमी जुगार खेळावर बंदी घालण्याबाबत

(४७) ३६४३८ (१०-०१-२०२२). श्री.राहूल कुल (दौंड), श्री.जयकुमार गोरे (माण) : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दौंड तालुक्यासह राज्याच्या ग्रामीण भागात ऑनलाईन रमीचे पेव फुटले असून अनेक तरुण बेकार झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच केरळ राज्यात अनेकांनी हा गेम खेळताना सर्वस्व गमावून आर्थिक भुर्दंड पत्करावा लागल्यानंतर आत्महत्या केल्यामुळे केरळ सरकारने ऑनलाईन रमी गेमवर बंदी आणली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणावर बंदी घालण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिलीप वळसे-पाटील (१७-०३-२०२२) : (१) हे खरे नाही.

माहे जानेवारी, २०१८ ते माहे डिसेंबर, २०२१ या कालावधीत ऑनलाईन रमी जुगार खेळ संदर्भात राज्यात कोठेही गुन्हा दाखल झालेला नाही.
(२) केरळ सरकारने ऑनलाईन गेम संदर्भात अधिसूचनेद्वारे केरळ राज्यात बंदी घातली होती. मा.उच्च न्यायालय, केरळ येथे दाखल रिट पिटीशन मध्ये मा.उच्च न्यायालयाने सदर

अधिसूचना रद्द केलेली आहे. सदर निकालाच्या आधारे, केरळ राज्यात ऑनलाईन रमी गेमवर बंदी नाही.
(३) संभाव्य ऑनलाईन गुन्हे टाळण्यासाठी जनजागृती कार्यक्रमातून अधिकारी कर्मचाऱ्यांसह सामान्य नागरिकांना जागरुक करण्यात येत आहे.

महाराष्ट्र सायबरमार्फत Antiphishing Portal सुरु करुन दिनांक ०८/०३/२०१९ रोजी www.reportphishing.in या वेब पोर्टलचे लोकार्पण करण्यात आले आहे. तसेच महाराष्ट्र सायबर कार्यालयाची www.mhcyber.gov.in वेबसाईट दिनांक ०८ मे, २०२० पासून सुरु करुन त्याद्वारे नागरिकांना प्रेसनोट व ॲडवायसरी प्रसारित करुन सायबर सुरक्षेबाबत जनजागृती करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

चेंबूर (मुंबई) येथील राहूल नगरात संशयावरुन एका तरुणाचा खून केल्याबाबत

(४८) ३६४९१ (१४-०१-२०२२). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चेंबूर (मुंबई) येथील राहूल नगरात विभक्त झालेले असतांनाही महिलेचे दुस-यासोबत संबंध असल्याच्या संशयातून तिच्या पहिल्या पतीने शरीरावर १० वार करुन खून केल्याची घटना दिनांक १० नोव्हेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास घडल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरण स्थानिक पोलिस स्थानकांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणातील आरोपीला अटक करण्यात आले आहे काय व त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिलीप वळसे-पाटील (१७-०३-२०२२) : (१), (२), (३) व (४) दिनांक १०/११/२०२२ रोजी फिर्यादी यांची बहिण घरातून रिक्षाने नोकरीच्या ठिकाणी जाताना राहूल नगर येथे रिक्षा अडवून तिच्यावर हत्याराने वार करुन ठार केल्या प्रकरणी आर.सी.एफ पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.र.क्र. ६३६/२१ भा.द.वि. कलम ३०२, ३४१ सह भारतीय हत्यारबंदी कायदा कलम ४,२५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयामध्ये आरोपी यास अटक करण्यात आली आहे. आरोपी विरुद्ध पुरावा प्राप्त करुन मा.न्यायालयात दोषारोपत्र दाखल करण्यात येत आहे. आरोपी सध्या न्यायालयीन कोठडीत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

महाराष्ट्रात चार वर्षात ॲट्रॉसिटीचे गुन्हे ५० टक्यांनी वाढल्याबाबत

(४९) ३६६३१ (१०-०१-२०२२). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रात मागील चार वर्षात अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीच्या नागरिकांवर अत्याचाराची संख्या वाढतच असून ॲट्रॉसिटी कायद्यांतर्गत गुन्ह्यांची वाढती संख्या ५० टक्क्यांनी वाढली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०२० या कालावधीत नॅशनल क्राईम रेकॉर्डस ब्युरोच्या (एनसीआरबी) यांच्या अहवालानुसार ॲट्रॉसिटीच्या गुन्ह्यांमध्ये देशात महाराष्ट्र राज्याचा पाचवा क्रमांक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ॲट्रॉसिटी कायद्यांतर्गत नोंद झालेले खटले न्यायालयात प्रलंबित असून शासनाने याबाबत चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिलीप वळसे-पाटील (१३-०४-२०२२) : (१) अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम, १९८९ अन्वये महाराष्ट्र राज्यामध्ये अनुसुचित जाती व जमातीच्या व्यक्तींवर अत्याचार झाल्याबाबत दाखल गुन्हयांची माहिती नमुद प्रमाणे आहे.

	सन २०१७	सन २०१८	सन २०१९	सन २०२०	सन २०२१
अ.जाती	१६८६	१९७४	२१५२	२५८१	२११२
अ.जमाती	४६७	५२७	५६२	६६९	५१६
एकुण	२१५३	२५०१	२७१४	३२५०	२६२८

(२) महाराष्ट्र राज्यात अनुसुचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील लोकसंख्या जास्त असल्याने अ. जा. व अ. ज. प्रवर्गातील दाखल गुन्हयाची संख्या जास्त आहे, परंतु अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या प्रति लाख लोकसंख्येच्या मागे दाखल गुन्हयांच्या आधारावर महाराष्ट्र राज्याचा देशात ८ वा क्रमांक आहे.

(३) २०२१ अखेर न्यायालयात प्रलंबित प्रकरणांची संख्या खालील प्रमाणे नमुद आहे.

	न्यायालयात प्रलंबित गुन्हे
अनुसुचित जाती	१०८५३
अनुसुचित जमाती	३०८०
एकूण	१३९३३

अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम, १९८९ अन्वये दाखल गुन्हयांचा तपास अचुक करणे, विहित वेळेत दोषारोप पत्र दाखल करणे, केंद्र शासन, राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोग, राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोग, यांच्याकडून प्राप्त

अनुषंगाने कार्यवाही करणेबाबत राज्यातील सर्व पोलीस घटक प्रमुख आणि तपासी अधिकारी यांना सूचित करण्यात आले आहे.

सर्व पोलीस घटक प्रमुख यांना दोषसिध्दीचे प्रमाण वाढविण्यासाठी व साक्षीदार फितूर होण्याचे प्रमाण कमी करण्यासाठी गुन्ह्यांमध्ये जास्तीत जास्त प्रत्यक्षदर्शी साक्षीदार व वैज्ञानिक पुरावा मिळविण्याबाबत सूचित करण्यात आले आहे. तसेच पैरवी अधिकारी हे खटला सुनावणीच्या वेळी फिर्यादी, साक्षीदार व पंच यांना गुन्हयासंदर्भात मार्गदर्शन करतील अशा व इतर करावयाच्या उपाययोजनांबाबत परिपत्रक पाठवून सुचना देण्यात आल्या आहेत. दोषसिध्दीचे प्रमाण वाढविण्यासाठी, गंभीर गुन्हयांमध्ये विशेष सरकारी अभियोक्ता यांची नेमणूक करण्याबाबत सर्व घटक प्रमुखांना सुचना देण्यात आल्या आहेत. दोषसिध्दीचे प्रमाण वाढविण्यासाठी निर्दोष सुटलेल्या गुन्हयांचा व पोलीस तपासावर प्रलंबित गुन्हयांचे कारणांचा आढावा घेवून असणा-या त्रुटींबाबत मार्गदर्शन करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राष्ट्रीय महामार्गासाठी घेतल्या जाणाऱ्या जमिनींना दिला जाणारा मोबदला ५० टक्क्यांनी कमी केल्याबाबत

(५०) ३६६५२ (१०-०१-२०२२). श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.राजेश पवार (नायगांव) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय महामार्गासाठी घेतल्या जाणाऱ्या जमिनींना दिला जाणारा मोबदला निम्मा म्हणजेच ५० टक्के कमी करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णय सद्यस्थितीत सुरू असलेल्या प्रकल्पांसाठी लागू असणार नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निर्णय घेण्यामागची सर्वसाधारण कारणे कोणती आहेत ?

श्री. बाळासाहेब थोरात (२४-०२-२०२२) : (१) व (२) केंद्रीय रस्ते परिवहन व महामार्ग मंत्रालयाने केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने राज्यातील विद्यमान राष्ट्रीय व राज्य महामार्ग सन्मुख जमीनी व विकास नियोजन आणि प्रादेशिक नियोजन क्षेत्रातील बिन शेती दर असणाऱ्या जमिनींच्या भूसंपादनाकरीता गुणक घटक “एक”
करण्याचा निर्णय शासन अधिसुचना दिनांक ०५.१०.२०२१ अन्वये घेण्यात आला आहे, त्यामुळे भूसंपादन मोबदला काही अंशी कमी झाला आहे. प्रस्तूत निर्णय प्रगतीप्रथवरील प्रकल्पांना लागू राहणार नाही.

(३) सर्वसाधारण कारणे-

१) ग्रामीण भागातील महामार्ग सन्मुख जमिनींच्या दरामध्ये सदर जमिनीच्या संभाव्य बिनशेती/वाणिज्यिक क्षमतेनुसार (Potential) दर निश्चित करण्यात आले आहेत.

२) सदरच्या दरामध्ये महामार्ग सन्मुख जमिनीचे भविष्यात होणारी बाजारक्षमतेतील वाढ देखील प्राप्त होत आहे.

३) राज्य/राष्ट्रीय महामार्गासाठी भूसंपादन करावयाच्या जमिनीचे निश्चित केलेले दर हे त्याच गावातील कृषक क्षेत्राला लागू असलेल्या दरापेक्षा अनेक पटीने अधिक तसेच ग्रामीण भागातील (त्याच गावातील) बिनशेती दरापेक्षा अधिक असल्याचे निदर्शनास येते.
४) राष्ट्रीय महामार्गाकरीता करण्यात येत असलेल्या भूसंपादनाकरीता एकूण खर्चामध्ये बेसुमार वाढ असल्यामूळे प्रकल्प खर्च वाजवी करण्यासाठी.

विधान भवन :
मुंबई.

राजेन्द्र भागवत
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.